
जीवनचिंतन
डॉ. सुहास पेठे

।। श्री ।।

जीवनचिंतन

(दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

जीवनचिंतन
पुस्तकरूपाने प्रकाशित तिसरी आवृत्ती : जुलै २०१९
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :

वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

चिंतनपुष्पानुक्रम

१. वापर, उपयोग हवा, तर काळजीही घ्यावी ! / ६
२. अहंकाराच्या आजारावरचं औषध / ९
३. सद्‌गुणांचा सुगंध / १२
४. संधीचे कालपक्षी / १५
५. परतीचा रस्ता / १८
६. सुखदुःखाचं मूळ ! / २१
७. निर्भयतेची वाटचाल / २४
८. हातांचं चीज / २७
९. दानाचं वळण / २९
१०.विधायक निवड / ३२
११. पाहाणं आणि पारख /३५
१२. मनुष्यजीवनाची पहाट / ३८
१३. माणसाला माणसाची गरज सदैवच /४१
१४. अवनतीचा मंत्र / ४४
१५. भूमिकेतला आनंद / ४७
१६. विधायक अस्वस्थता / ५०
१७. दृष्टिदोष..! / ५३

१८. आदर्श गोष्टींतला विधायक क्रम / ५६
१९. आनंदाचं शिक्षण स्वतःतच ! / ५९
२०. खऱ्या औदार्याचा आनंद ! / ६२
२१. नित्योपासना / ६४
२२. माणूस जोडावा, कार्य उभं राहातं ! / ६७
२३. सहनशीलतेचं मोल / ७०
२४. पाहुणचार – असाही ! / ७४
२५. वेळ नाही..? / ७७
२६. कर्तृत्व आणि सांभाळ / ८०
२७. सद्‌गुणांची वाटचाल /८३
२८. अलौकिक देणगी – जीभ / ८६
२९. खऱ्या सुखाची गुरुकिल्ली / ८९
३०.निःशब्द मदतनीस ! / ९२
३१. कणभर–मणभर / ९५
३२. योग्यतेचे (!) भ्रम / ९८
३३. हौसेला मोल आहे ! / १०१
३४. जीवनचिंतनाची गरज ! / १०४

***

अनुभव छोटे, महत्त्व मोठे !

आपण वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या पातळ्यांवर जीवन जगतो आहोत. त्यांत आपली राहाण्याची ठिकाणं, तिथलं वातावरण, घरांच्या ठेवणी, सुखसुविधा, शिक्षण, नोकरी, व्यवसाय – अशा अनेक गोष्टी वेगळ्या आहेत. आर्थिक स्थितींपासून संस्कारांपर्यंत, आपल्या जगण्यात अनेक प्रकार आहेत. त्यांत अनेकदा जमीनअस्मानाचा फरकही आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात काही बदल होत असले, तरी प्रकारांतली भिन्नता ही तशी कायमच राहाणार आहे, हे आपण समजून घेऊ शकतो.

तरीही, आपापल्या ठिकाणी येणारे अनुभव,त्यामुळं होणारी सुखदुःखं ही मात्र तशी समान आहेत. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर शोध, उपाय – हे सारे समाजव्यवस्था, धर्मकारण, राजकारण अशा मोठमोठ्या पातळीवरचे विषय आहेत. ते आपापल्या परीनं चालू असतातच.

सामान्य माणसाला मात्र, त्याच्यापुरता हाती असलेला उपाय म्हणजे, त्याला येणाऱ्या छोट्याछोट्या अनुभवांचा, त्यांतून शिकण्याचा मार्ग! तसं शिकणं अनेकदा परिचित नसतं, असलं तरी बेसावधतेनं असे अनुभव हातून निसटून जातात. ते छोटे असले तरी, ते आपल्याला सुखी होण्यासाठी मोठा आशय देऊन जात असतात. त्यांतलंच उपयोगी असं थोडं काही, या 'जीवनचिंतना'च्या निमित्तानं जिज्ञासूंच्या हाती ठेवण्याचा हा नम्र प्रयास ! त्यांतले संदेश घेऊन आपलं जीवन अधिक सुखी करू इच्छिणाऱ्या सहृदय वाचकांना 'जीवनचिंतन' अर्पण करण्यात मला आनंद होत आहे.

यांतली बरीच चिंतनं सातारा आकाशवाणीवर तिथले अधिकारी श्री.मोकाशीसाहेब व त्यांचे सहकारी यांनीअगत्यानं प्रसारित केली. त्यांचा मी ऋणी आहे. पुस्तकरूपानं हे आकाराला येण्यात मदत करणाऱ्या सर्वांचा मी कृतज्ञ आहे. ही सेवा वाचकांनी स्वीकारावी, अशी मी त्यांच्या चरणी प्रार्थना करतो.

संतनगरी, सातारा – सुहास पेठे

१. 'वापर, उपयोग हवा, तर काळजीही घ्यावी !'

आपण अनेकदा हे चित्र पाहिलं असेल. बाहेर कामाला निघालेली व्यक्ती आपल्या दुचाकीला पाचपाच सहासहा वेळा स्टार्टर देते आहे. गाडी सुरू होणं राहू द्या, पण दरवेळी होणारा खडखडाट थांबत नाही. मग किकवर किक मारण्याची धडपड सुरू होते. ते ऐकणारी, बाजूनं जाणारी माणसं वाढत जातात. इकडं कामाला निघायला वेळ होतो. तशी पुढची प्रत्येक किक आणखी चिडून मारली जाते. त्याचा अर्थात फारसा उपयोग नसतो. गाडीची चूक नसते. पण ते लक्षात येण्याएवढं चित्त त्यावेळी शांत नसतं. मग दुसऱ्या कुणाची गाडी घेऊन कसंतरी काम गाठावं लागतं. कारण नेहमीचंच असतं. गाडीचं सर्व्हिसिंग वेळच्या वेळी झालेलं नसतं.

काही जण घराबाहेर आले की, गाडी थेट सुरू करतात, बसतात आणि निघून जातात. मग ऑफिसमध्ये पोचल्यावर गाडीच्या सीटवरची आपल्या शर्टाला किंवा ड्रेसला लागलेली धूळ पाहून अस्वस्थ होतात. गाडीवर चिडतात. वास्तविक, गाडीवरून आल्यावर किंवा निघताना, गाडीच काय गाडीची सीटसुद्धा साध्या फडक्यानं आपण पुसलेली नसते. गाडी धुणं दूरच. यासाठी एक सोपं वाक्य कायम समोर असावं. 'वापर, उपयोग हवा आहे,तर काळजीही घ्यावी!' ते आपलं कर्तव्यच नाही का?

मोठ्या गाड्यांची अवस्था काही यापेक्षा वेगळी नसते. त्यात्या प्रकाराप्रमाणं त्यात्या वाहनाची घ्यायची काळजी वेगवेगळी असते. पण काळजी घेण्याचं कर्तव्य समान असतं. टायरची हवेची प्रेशर वेळीच पाहिलेली नसतात. गाडीत इंधन किती आहे, आपला

प्रवास केवढा आहे, याची पाहाणी केलेली नसते. ऑईलची पातळी पाहिलेली नसते. मग कसं अडचणीत यायला होतं, याचे अनुभव अनेकांना असतील. ऑईल संपलेली गाडी एकदोन किलोमीटरही जाऊ शकत नाही. तिथल्या माणसांना बोलावून दुसऱ्या गाडीनं ही गाडी ओढून न्यावी लागते. वेळेत आणि योग्य काळजी न घेणं, हे आपल्याला आणि बरोबरच्यांनाही त्रासाचं ठरतं. अडचणीत आणतं. वेळ, पैशाचा अपव्यय घडवतं.

हे काही नुसत्या गाडीपुरतं नाही. गाणं सुरू होण्याची वेळ झालेली असते. गायक तयारीत असतो. श्रोते वाट पाहात असतात. पण तबला काही अचूक लागत नाही. तो सगळीकडं समान, सुसंगत स्वर देत नाही. स्वर कधी कमी, कधी जास्त लागतो. याचं कारण, अर्थातच तबला लावणाऱ्याचं कौशल्य कमी असतं, असं नव्हे. तो मुद्दाम वेळ काढतो, असंही नव्हे. विसरलेलं असतं ते -'वापर, उपयोग हवा, तर काळजी घ्यावी', हे ! काम झाल्यावर तबला अर्धा स्वर उतरवून ठेवणाऱ्याचा, त्यावरची गादी नीट बांधून ठेवणाऱ्याचा आणि एरवी तो तबला हवेच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवण्याची काळजी घेणाऱ्याचा तबला, वापराच्या वेळेला, दोन मिनिटांत आणि अचूक लागतो !

हे नुसतं अशा कुठल्या गोष्टींबद्दल असतं, असं नाही. स्वयंपाकघरात तशा वस्तू रोजच्या वापरातल्या असतात. वापरणारं माणूसही नेहमीचं, सरावलेलं असतं. तरीही विशिष्ट भांडी, विशिष्ट वस्तू यांची प्रत्यक्ष स्वयंपाक करायच्या वेळेला शोधाशोध सुरू असलेली आपल्याला दिसेल. वस्तू तर काही कुठं आपल्या मनानं बाहेर जात नाहीत. तशा त्यांच्या ठेवण्याच्या जागाही ठरलेल्या

असतात. पण, जेव्हा कधी त्या पूर्वी वापरल्या, त्या वापरून झाल्यावर धुऊन, पुसून परत आल्यावर जागच्या जागी ठेवल्या गेलेल्या नसतात, म्हणून वेळेला त्या त्यांच्या जागी सापडत नाहीत. त्यात आणखी नुकसान असं की, ठरलेल्या जागी ती वस्तू नसली, तर त्या गडबडीच्या वेळेला ती न सापडल्यामुळं एकतर आपली चिडचिड होते, नाहीतर अकारणच दुसऱ्या कुणीतरी ती नीट न ठेवल्याची शंका येते. हे सारं नुकसान त्यावेळेला दहापंधरा मिनिटं मनस्ताप देणारं असलं तरी, या पद्धतीनं काम करायची सवय लागली तर,ती अनेक क्षेत्रांत अनेक वर्षं आपलं किती नुकसान करीत असेल, याची कल्पना केलेली बरी. तसं खरं तर हे टाळण्यासारखं आहे.

ऑफिसमध्ये पाहावं. अनेक माणसं, कामाच्या वेळेला वस्तू, पत्रव्यवहार यांच्या शोधाशोधीत अडकलेली दिसतात. ती वस्तू, ती फाईल मिळाल्यावर होणारं काम पाच मिनिटांचं असतं. पण पूर्वी त्यात्या वस्तू वेळीच जागच्या जागी ठेवण्याची काळजी न घेतल्यामुळं, पाच मिनिटांच्या कामासाठी, शोधाशोधीची पन्नास मिनिटं जातात ! असं अनेक क्षेत्रांत, अनेक ठिकाणी सुरू असतं. वेळ, शक्ती, पैसा, गैरसोय, अपयश, विलंब - अशा असंख्य गोष्टी सहन करण्यापेक्षा 'वापर - उपयोग हवा, तर काळजी घ्यावी'. हे लक्षात ठेवणं आणि पाळणं अधिक सोपं नाही का ?

२.'अहंकाराच्या आजारावरचं औषध'

कुठल्याही माणसाच्या ठिकाणी कधीही अनुभवाला येऊ शकणारी 'अहंकार' ही मोठी विलक्षण वस्तू आहे. विलक्षण अशासाठी म्हणायचं की, माणसाचं नेहमीचं जीवन चालणं, हे त्यामुळं शक्य होतं. पण त्याचबरोबर याच अहंकारामुळं माणसाचं जीवन असह्य होतं. इतकंच नव्हे, तर त्याच्या संपर्कातल्या आजूबाजूच्या लोकांचं जीवनसुद्धा असह्य करण्याची शक्ती त्या अहंकारात आहे. जगातल्या मोठमोठ्या विनाशांना हा अहंकार जितका कारणीभूत आहे, तितकाच तो अनेक मोठ्या विधायक कामांच्या मागेही उभा असू शकतो.

तो विलक्षण अशासाठी आहे की, माणूस कुठल्या अर्थानं लहानमोठा असण्याशीही त्याचा संबंध नाही. तो गरीबांतही वावरताना दिसेल आणि श्रीमंतांतही. पण आपल्याला आढळेल की, साधारणपणे कुठल्याही अहंकारी माणसाच्या जवळ राहाणं, वावरणं हे कुणालाही नकोसं असतं. तशी ती अंतरंगातली वस्तू असल्यामुळं ती ओळखणं, तिच्याबद्दल जागृत होणं किंवा तिचं काय करावं, हे कळणं, हे अवघड काम आहे.

अशीही शंका येणं स्वाभाविक आहे की, निसर्गानं माणसाच्या एवढ्या छान, प्रगत जीवनात ती का ठेवली असेल? त्यालाही कारणं आहेत. आपण तान्हं बाळ रडताना पाहिलं असेल. त्यावेळी त्याला नक्की काय होतं आहे, काय हवं आहे, हे एखादी अनुभवी व्यक्तीच सांगू शकेल. भूक, तहान, थंडी, उन्हाळा - अशा कसल्याही कारणानं ते रडत असू शकतं. यांतलं काही होत असलं, तर त्याला

कळावं, यासाठी त्याच्या ठिकाणी निसर्गानं ठेवलेलं हे स्फुरण म्हणजे हा अहंकार होय. हे स्फुरण त्यावेळी गरजेकरता असतं, अस्फुट असतं. तसं असताना त्याचा कुणाला त्रासही नसतो.

पण एवढी गरजेपुरती ठेवलेली वस्तू, माणूस मोठा होत जाईल, तशी नकळत केवढं घातक स्वरूप धारण करते ! शिक्षण झालं की ज्ञानाचा अहंकार, कर्मं केली की कर्तृत्वाचा अहंकार, माहिती-तंत्रज्ञान शिकलं की त्याचा अहंकार, काही कला शिकली की, तिचा अहंकार - अशा किती प्रकारे, या छोट्या गरजेच्या वस्तूचं, त्रासाच्या वृत्तीत रूपांतर होत जातं ! त्यात स्वतःच्या अहंकाराची कल्पनाही ते स्वतःला येऊ देत नाही. माणसाला बेसावध ठेवतं. मग उच्चशिक्षित असला,तज्ज्ञ असला, मोठा गायक-वादक-कलाकार असला, तरी अशा अहंकारी व्यक्तींचा सहवास, लोक कसे टाळतात, ते आपण पाहातोच. मग, माणूस नाईलाज असेल, तर गरजेपुरता त्यांचा संबंध ठेवतो आणि काम होताच, जितकं लवकर बाजूला होता येईल, तितकं लवकर बाजूला होतो !

अशी वस्तुस्थिती अनेकदा आढळत असली, तरी माणूस म्हणून ती 'आदर्श' नव्हे, हे नक्कीच ! ज्ञान असलं, कला असली, अनुभव असला आणि तरीही हा त्रास देणारा अहंकार नसेल, तर अशी माणसं सर्वांना हवीशी असतात, प्रिय असतात. कारण, या साऱ्या ज्ञान, अनुभव, कलांबरोबर त्यांच्याकडं निसर्गानं बहाल केलेला, आणखी एक मोलाचा गुण जपलेला असतो. तो म्हणजे नम्रता ! विचारपूर्वक पाहिलं तरी, हे आढळेल की, आपण जे जे म्हणून मिळवलं असेल, त्या पलीकडं त्यात्या क्षेत्रात मिळवण्यासारखं खूप शिल्लक असतं. ते मिळवणंही अनेकदा अशक्य असतं.

विज्ञानाच्या क्षेत्रात अनेक मोलाची संशोधनं करण्यासाठी सबंध आयुष्य वेचलेले न्यूटनसारखे शास्त्रज्ञ, जेव्हा त्यांच्या ज्ञानाबद्दल बोलतात तेव्हा, अथांग महासागरावरच्या वाळूच्या विस्तीर्ण किनाऱ्यावरच्या, एखाद्या कणाएवढंसुद्धा ज्ञान मला मिळालेलं आहे असं वाटत नाही, असं म्हणतात, तेव्हा त्यांची थोरवी का टिकून आहे आणि ती कोणत्या नम्रतेच्या जाणिवेनं आली आहे, याचा उलगडा आपल्याला खचितच होईल. प्रत्येक क्षेत्रातल्या खऱ्या थोर व्यक्तींच्या ठिकाणी, याच्या जाणिवेनं आलेली नम्रता आपल्याला आढळेल. म्हणूनच अशी माणसं इतरांना आनंद देतात, उपयोगी पडतात, खरी थोर ठरतात.

कारण अहंकाराच्या होऊ शकणाऱ्या आजारावर नम्रता हे औषध आहे, याची त्यांना सदैव जाणीव असते !

३. 'सद्‌गुणांचा सुगंध'

आपण समाजात वावरतो, आपल्या भोवती असंख्य माणसं वावरत असतात. आपल्या ओळखीची, संबंधातली माणसं असं जरी पाहिलं, तरीसुद्धा ती असंख्य असतात. तसं माणूस म्हणून प्रत्येकजण सारखाच असतो. पण त्यांतल्या काहीच माणसांचा सहवास आपल्याला आनंद देतो, त्यांच्या सान्निध्यात राहावं असं वाटतं. आपल्या लक्षात येईल की, असं वाटतं त्याला फारसं काही बाह्य कारण नसतं. ते आंतरिक असतं. ते ज्यामुळं घडतं, त्यांनाच सद्‌गुण असं म्हणतात !

कुणी निस्वार्थी असतं, कुणी परोपकारी असतं, कुणी क्षमाशील असतं, कुणी मदतीला सदैव तत्पर असतं, कुणाकडं औदार्य असतं, सहानुभूती असते, प्रेम असतं ! तसंतर अशीही मोजकी माणसं इतरांसारखीच माणसं असतात. पण त्यांनी कष्टानं अशा सद्‌गुणांची जोपासना केलेली असते, त्यामुळं त्यांची व्यक्तिमत्वं अशी आनंदी आणि प्रसन्न होतात. माणसांची शरीरं थोड्याफार फरकानं जरी सारखी असली तरी, ही सद्‌गुणांची जोपासना, त्यांना हे खरं माणूसपण देते.

असे सद्‌गुण जोपासणं हे प्रयत्नपूर्वक, सातत्यानं आणि निष्ठेनं करण्याचं काम आहे. त्यासाठी योग्य तयारी करून घेणारे मार्गदर्शक, गुरूही लागतात. आपल्याकडं ती परंपरा फार पुरातन आहे. त्या परंपरेत सद्‌गुणांचा परिचय करून दिला जातोच, पण त्याहीपेक्षा, ते गुण आत्मसात करणं आणि आचरणात आणणं, याला अपरंपार महत्त्व दिलेलं आहे. त्यातही हे गुण आत्मसात करून ती विद्या, ते

गुण इतरांच्यात रुजवण्याचं कामही तितकंच महत्त्वाचं आहे. ते करू शकण्याची योग्यता यायला पुन्हा आणखी काही गुण लागतात, ज्यांत सहनशीलता आणि सबुरीला मोठं स्थान आहे. मग ते काम गुरू अशा सद्‌गुणी माणसांकडं सोपवतात.

भगवान बुद्धांच्या गोष्टीतून यावर शिकण्यासारखं आहे. स्वतः सद्‌गुण आचरून ते इतरांना देण्याची योग्यता आलेल्या शिष्याला निरोप देण्याची वेळ आली. बुद्धांनी विचारलं,'तू जर लोकांना उपदेश करायला जाशील, तर त्यांना ते आवडणार नाही, कुठल्या ना कुठल्या कारणावरून त्यांनी तुझी निंदा केली तर ?'

शिष्य म्हणाला,'मी शांत राहून माझं काम सुरू ठेवीन.' बुद्ध म्हणाले,'अशावेळी तुला शांत राहाणं कसं शक्य आहे?' शिष्य म्हणाला,'मी यात आनंद मानीन की, त्यांना पटलं नसलं तरी, ती मंडळी सज्जन आहेत. त्यांनी मला मारलं तर नाही!' बुद्धांनी विचारलं,'आणि त्यांनी तुला मारलं तर ?' शिष्य म्हणाला,'तरीही मी शांत राहू शकेन. कारण मला त्यांच्यात दयाभाव दिसून आनंद होईल की, त्यांना मला जिवानिशी तर मारलं नाही !'

त्यावर बुद्धांनी अंतिम प्रश्न विचारला,'आणि त्यांनी तुला जिवानिशी मारलं तर?' शिष्य म्हणाला,'हे भगवन्, हे सारं जग तर असंख्य दुःख, त्रास यांनी व्यापलेलं आहे. शरीर रोगांचं घर होऊ शकतं. आत्महत्या हे पाप असल्यामुळं ते करता येत नाही, अशावेळी मला जिवानिशी मारणाऱ्या अशा मंडळींचे मी उपकारच समजेन. कारण, या दुःखद संसारातून त्यांनी मला आपणहोऊन मुक्त केलं आहे !'

ते ऐकल्यावर बुद्ध समाधानी झाले, म्हणाले,'आता तुझ्या

ठिकाणी सद्‌गुण तर आत्मसात झालेच आहेत, पण इतरांना त्याचा लाभ व्हावा, म्हणून लागणारी सहनशक्ती आणि सबुरीही तुझ्या अंगी आली आहे. आता तू लोकांना सद्‌गुणांचा उपदेश करण्याला पात्र झाला आहेस !'

माणसाच्या जीवनाला सार्थकाची उंची देणाऱ्या सहनशीलता, शांती, क्षमा, सौजन्य - अशा असंख्य सद्‌गुणांचा हा प्रवास ! जगात जसं एका प्रकारचं फूल नाही, असंख्य प्रकारची आहेत, सुगंध एका प्रकारचा नाही, अनेक प्रकारचा आहे आणि प्रत्येक फूल आणि त्याचा सुगंध हे आनंदितच करणारे आहेत. अशी असंख्य फुलं आणि सुगंध यांसारखे हे अनेक सद्‌गुण आहेत. ते एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी एकवटतील, नांदतील, तर त्या व्यक्तीचा जीवनप्रवास किती आनंदाचा होईल ! नुसतं त्याचंच नव्हे तर, इतरांचं जीवन सुगंधित करणाराही !

४.'संधीचे कालपक्षी'

शिक्षणं पुरी करून अनेक जण नोकरीच्या शोधात असतात. त्यांच्या शिक्षणाप्रमाणं त्यांच्या नोकरीबद्दलच्याही वेगवेगळ्या कल्पना असतात. नोकरी मिळत नाही, तोपर्यंत इकडं शिक्षण, काही वेगवेगळी व्यावसायिक प्रशिक्षणं असंही सुरू असतं. पण अशा अवस्थेत असलेल्या सगळ्यांचीच मनःस्थिती, अपेक्षा, सावधानता, प्रयत्न - सारखेच असतात, असं नाही. काही रोजगाराच्या बातम्यांवर लक्ष ठेवून असतात. काही वेगवेगळ्या नोकरीच्या, कंपन्यांच्या संकेतस्थळांवर सतत पाठपुरावा करीत असतात, तर काही आपल्या बरोबर असलेल्या किंवा संधी मिळून नोकरीत पुढं गेलेल्या मित्रांच्या सदैव संपर्कात असतात.

पण बहुसंख्य युवक मात्र आपल्याला कळेलच, कुणीतरी सांगेलच अशा विचारात तरी असतात. ज्यांना त्यांच्या शिक्षणानुसार, अपेक्षांनुसार तशीच नोकरी हवी असते, अशी युवक मंडळी आपल्याला पाहिजे तशी, पाहिजे त्या क्षेत्रातली संधी येईपर्यंत वाट पाहायची असते अशाच समजुतीत असतात. तोपर्यंत आपण काही पर्यायी विचार कशाला करायचा, अशा समजुतीत असतात. पण या नादात, त्यांच्यासमोर वेगवेगळ्या क्षेत्रांतल्या अनेक संधी-जाहिराती येत असतात, त्यांच्याकडं यांचं दुर्लक्ष होतं. अशा अनेक जाहिराती वाचूनसुद्धा, एखाद्या सामान्य बातमीसारख्या ते, त्या जाहिराती सोडून देतात !

काहीजण खऱ्या अर्थानं जागे असतात. आहे त्या परिस्थितीत, जी मिळेल ती संधी घेण्यासाठी तत्पर असतात.अचानक

अनपेक्षित असलेली कुठलीतरी संधी त्यांना कळते. त्यासाठी ते धडपड करतात, जागतात, परीक्षा देतात. इतरांना एके दिवशी कळून जातं, की त्यांची निवड होऊन, ते नोकरीत हजरही झालेले आहेत.

या संदर्भात एक गोष्ट ऐकण्यासारखी आहे. चित्रांची प्रदर्शनं घडवून आणणाऱ्या एका आर्टगॅलरीत, काही चित्रांचं एक प्रदर्शन भरलं होतं. येणाऱ्या मंडळींच्या स्वागतासाठी आणि त्यांना ती चित्रं दाखवण्यासाठी, कुणाचं शंका निरसन करण्यासाठी, तिथं मांडलेल्या चित्रांचे कलाकारही उपस्थित होते.त्या प्रदर्शनात पारंपरिक चित्रं होती. त्याबरोबर त्यात नवचित्रकलेतल्या चित्रांचाही समावेश होता.

प्रत्येक चित्राचं आपलं एक वैशिष्ट्य आणि सौंदर्य होतं. ते पाहात पाहात जाणारे प्रेक्षक, एका चित्राजवळ थोडं थांबून थांबून पुढं जात होते. बऱ्याच जणांना ते चित्र कळलं नव्हतं, हे त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं. त्या प्रेक्षकांतले एक प्रेक्षक जिज्ञासू होते आणि जाणकारही होते.

त्यांनी मात्र, ते चित्र काढणाऱ्या चित्रकाराला विचारलं की,'हे चित्र कशाचं आहे?'

तसं ते चित्र नेहमीच्या साच्यातलं नव्हतंच. चित्रातली आकृती मानवी वाटत होती. पण तिचा चेहरा, डोक्यावरचे केस पुढं घेऊन, पूर्ण झाकला होता. गरुडासारख्या एखाद्या पक्ष्याला असावे, तसे मोठे पंख त्या मानवी आकृतीच्या पायाला होते.

चित्रकार म्हणाला,'हे चित्र 'संधीच्या कालपक्ष्या'चं आहे!'

त्या जाणकारानं विचारलं,'मग याचा चेहरा असा झाकलेला का आहे?'

कलाकार उत्तरला,'काळाच्या ओघात जेव्हा संधी समोर येते,

तेव्हा डोळ्यांवर आपल्या कल्पना,विचार, बेसावधपणा अशा कुठल्यातरी केसांची झापड असल्यामुळं, ती संधी ओळखता येत नाही, हे ते दर्शवतं!'

जाणकारानं विचारलं,'मग हे एवढे मोठे पंख पायाला कशासाठी लावले आहेत?'

कलाकार उत्तरला,'अशी न ओळखलेली संधी काळ, पक्ष्याच्या वेगानं कधी घेऊन जातो, हेही कळत नाही आणि तो काळ असल्यामुळं तो पुन्हा परतत नाही !'

नोकरीच्या संधींचं असंच आहे. काहींना नोकऱ्या मिळून जातात, काही जण वर्षानुवर्षं वेगवेगळ्या कल्पना डोक्यात घेऊन बेकार राहातात. त्याचं कारण उघड आहे. त्यांच्या पगाराच्या अपेक्षांनी, विशिष्ट कल्पनांनी, वेळी आळसानंसुद्धा - डोळ्यांवर झापड येऊन, संधी घेऊन आलेला असा कालपक्षी त्यांना दिसत नाही! संधी उडून जातात !

असे 'संधीचे कालपक्षी' वेळीच न ओळखण्यानं आणि त्यांचा लाभ न घेण्यानं, अनेक क्षेत्रांत, अनेकांचं नुकसान होत असतं. ते ओळखलं, तर टाळता येण्यासारखं आहे !

५.'परतीचा रस्ता'

एक प्रौढ गृहस्थ होते. व्यापार होता. धंदा उत्तम चालत असे. पैसापाण्याला कमी नव्हतं. पण अस्वस्थ असत. त्यांचे वडील एका सत्पुरुषांकडे जात. पण यांना त्याचं काही विशेष महत्त्व वाटलं नाही. फक्त यांच्या लक्षात राहिला तो, त्या साधूंचा शांत, प्रसन्न चेहरा.

असे अनेक दिवस अस्वस्थतेत काढल्यानंतर एक दिवशी त्यांच्या डोळ्यांसमोर तो चेहरा आला. त्यांच्या मनात क्षणभर विचार आला, की आपण एवढे धनवान आहोत, एवढे यशस्वी आहोत, प्रतिष्ठित आहोत - त्यांतलं तर त्या साधुपुरुषांकडं काहीच नाही. पण त्यांच्याजवळ जी प्रसन्नता आहे, ती कशानं आली असेल ? त्यांनी थेट त्या साधुपुरुषांना गाठलं. ते त्यांच्या नेहमीच्या आसनावर शांत बसले होते. बाजूला एकदोन जण बसलेले होते.

साधूंनी यांना ओळख दिली. यांनी त्यांना नमस्कार केला. फक्त खूप वर्षांनी गेल्यामुळं आणि आपला प्रश्न कसा काय बोलायचा - यांमुळं ते इतरांबरोबर, तिथं एका कोपऱ्यात शांत बसून राहिले. यांना कळत होतं, इथं अगदी खालच्या थरापासून उच्चभ्रू लोकांपर्यंत सर्वांची ये-जा होत होती. त्याचा काही परिणाम त्या साधूंवर होत नव्हता. ते तितक्याच प्रसन्नतेनं सर्वांची विचारपूस करीत होते.

थोड्या वेळानं एक शेतकरी आला. आणलेली सफरचंदं त्यानं साधूंना अर्पण केली. त्यांनी त्या फळांना हात लावला आणि 'स्मरण कायम आहे ना?'असं अगत्यानं विचारलं. त्यानं समाधानानं सांगितलं, 'होय.ती बुद्धी टिकावी, म्हणून हे पहिलं दान आपण स्वीकारावं!'साधूंच्या चेहऱ्यावर समाधान दिसलं.त्यांनी त्या गृहस्थाला

आशीर्वाद दिला. तो निघून गेला.

जवळ बसलेल्या गृहस्थानं 'ही फळं आत ठेवू का?' असं विचारलं. त्यांनी त्याला खुणेनंच नकार दिला. विचारलं,'तुला काही भूक लागली आहे का?' ते गृहस्थ म्हणाले,'नाही.' थोड्या वेळानं एक माणूस आत आला. त्यानंही डोकं टेकून नमस्कार केला. त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतं, की तो मजुरी करणारा कामगार आहे.

आता साधूंनी या गृहस्थांना ती सारी फळं पिशवीत भरायला सांगितली आणि त्या मजुराला बोलावून त्याच्या हातात ठेवली. मजुराच्या डोळ्यांत पाणी आलं होतं. पण त्यानं ती पिशवी हातात घेतली आणि म्हणाला,'प्रभु, काम नाही मिळालं. दोन दिवसांची तरी सोय झाली.' साधू तितक्याच प्रसन्नतेनं म्हणाले,'तू शोध घेत राहा. दोन दिवसांची तर सोय झाली. तिसऱ्या दिवशी देवाकडून काम मिळेलच!'

बाजूला बसलेल्या या प्रौढ धनिकाला मात्र आता राहवेना. ते साधूंच्या समोर येऊन बसले आणि म्हणाले,'माझ्या आयुष्यात खूप अस्वस्थता, अशांती आहे. तसं लौकिदृष्ट्या मला काही कमी नाही, उलट खूप आहे. माझी ही अशांती कशी कमी होईल, हे काही मला कळत नाही. म्हणून मी आपल्याकडं आलो आहे!'

साधू म्हणाले,'तुझी अशांती संचयानं आली आहे. तू रोज सकाळी फिरायला जातोस ना?' ते म्हणाले, 'हो.' 'मग परतताना त्याच रस्त्यानं येतोस ना, की परतायला वेगळा रस्ता लागतो? परत यायला वेगळ्या रस्त्याची गरज नसते. ज्या रस्त्यानं अशांतीला गेलास, त्याच रस्त्यानं तुला शांतीला येता येईल !'

'मला एक सांग, परतताना रस्ता तोच असतो. पण एक महत्त्वाचा फरक असतो. रस्ता तोच असला, तरी परतताना दिशा

बदलावी लागते! हे तुझ्या लक्षात आलं ना? इतकी वर्षं संचयाची दिशा चाललीस, आता दिशा बदल. त्यागाच्या दिशेनं शांतीच्या घरी येशील! पोट भरल्यावरही आपल्याला मिळत राहिलं, तर ते आपला हात लागून दुसऱ्याला देण्यासाठी असतं, हे लक्षात ठेवावं !'

साधूंचं हे म्हणणं लक्षात घेतलं, तर धनिकांना शांती लाभेल आणि गरीबही उपाशी राहणार नाहीत. गरज आहे, ती जीवनात शांतीचं स्थान महत्त्वाचं आहे, हे ओळखण्याची समजूत आणि त्यासाठी कृतीची तयारी !

६. 'सुखदुःखाचं मूळ !'

ज्याला त्याला आपल्या सुखदुःखाची काळजी आहे. सुख मिळवण्याची आहे, तशी दुःख टाळण्याचीही आहे. प्रत्येक जण अशी आपापल्या सुखदुःखाची काळजी करतो आहे. असं जर आहे, तर जगात माणसं सुखी दिसली पाहिजेत. आपला अनुभव सांगेल की, बहुसंख्य माणसं ही, इतकी, अशा प्रकारची काळजी घेऊनही पुन्हा दुःखी आहेत. कुणी ते व्यक्त करतो, कुणी करीत नाही. कुणी त्याकडं दुर्लक्ष करतो, कुणी त्यानं अस्वस्थ होतो. कुणी ते स्वीकारतो, कुणी त्याच्याशी अजून संघर्ष करीत बसतो. अर्थात, हे दुःखावरचे उपाय नव्हेत. ते फक्त त्याच्याशी तोंड देण्याचे, आपापल्या समजुतीप्रमाणं काढलेले मार्ग आहेत. पण मूळ दुःख टळत नाही, हे मात्र खरं !

याला कारण काय असावं, त्याचा विचार करून या सुखदुःखाचं मूळ शोधल्याशिवाय याचं उत्तर सापडणार नाही. सुखदुःख ही तशी जोडगोळी आहे. जूनअखेर ओढ देत पाऊस एकदम येऊन धडकतो. उन्हाळ्यानं कंटाळलेला शहरी माणूसही जातायेता आनंदानं त्या पावसाचं-गारव्याचं सुख घेतो. दोनचार दिवस गेल्यावर मात्र, ते सुख ओसरतं. मग त्याची सारखी तक्रार सुरू होते. दुचाकीवरून जाताना कितीही चुकवायचा प्रयत्न केला, तरी खड्ड्यातल्या चिखलाच्या पाण्याचा फवारा अंगावर उडवीत, एखादी चारचाकी शेजारून निघून जाते. मग मनातल्या मनात त्यांचा उद्धार होतो. रेनकोट, टोप्या सगळं बाळगूनही अंगावर उडालेले डाग आणि भिजलेले कपडे ऑफिसमध्ये दिवसभर काम करताना, ते दुःख ताजं करीत राहातात. रोज टोपी, रेनकोट, बूट सगळं बाळगण्याचा कंटाळा

येतो. मग अनेकांना पाऊस दुःखाचा ठरतो.

पण नेमका इथंच दुसरीकडचा विचार करावा ! तिकडं शेतात पेरण्या करून आठवडे उलटलेले असतात. जमिनी करपून हातची पेरणी जायचं दुःख भेडसावीत असतं. त्यासाठी भजन, प्रार्थना सारं करीत असलेल्या शेतकऱ्यांना मात्र, या पावसानं दिलासा दिलेला असतो. पावसाच्या अशा दमदार येण्यानं पुढच्या सबंध पिकाचं सुख डोळ्यांसमोर दिसतं. शहरातल्या अशा जाण्यायेण्यातल्या - चिखलपाण्याच्या दुःखात, तिकडं शेतकऱ्यांच्या प्रार्थनेला आलेल्या सुखाच्या फळाचा विचार, मनातही येत नाही ! म्हणून यांना तो पाऊस दुःखाचा वाटतो !

पुढं काही काळ हाच पाऊस एकदम ओढ देऊन गायब होतो. भेटीला येतो,तो अचानक, दमदार सरींनी ! या सरींचा अंदाज लागत नसल्यामुळं होणाऱ्या त्रासानं, अशा कामकाजावर जाणाऱ्या शहरी माणसाची त्रेधातिरपिट होते. त्रागा, दुःख होतं. पण त्याच वेळी शेतकरी सुखात असतो, कारण त्याला ही उघडीप दिलासा देते. त्यांची उघडीपीतली कामं होतात. इथं लक्षात घेणं आवश्यक आहे की, माणूस शहरी झाला किंवा खेड्यातला झाला, तरी तो मुळात, अशा वेळेवर येणाऱ्या पाऊसपाण्यानं, कष्टानं पिकणाऱ्या धान्यावरच जगत असतो !

तसं पाहिलं तर, खरं अंतिम सुख हे वर्षभर आपल्याला जगवणारं अन्नधान्य मिळण्यात असतं ! निसर्गाला सर्वच जिवांची काळजी असते. माणसाला मात्र काळजी असते, ती आपल्या स्वतःच्या सुखाची. थोडं समजुतीनं पाहिलं, तर त्यासाठी थोडा दुःखाचा वाटाही स्वीकारावा लागतो. शेतकऱ्यांनाही कधी अवकाळी

येणाऱ्या, अकाली ओढ देणाऱ्या, दडी मारणाऱ्या पावसाचं दुःखंही वाटून घ्यावंच लागतं. त्यामुळं लक्षात घेऊया की, दुःखाचा वाटा सर्वांनीच थोडाफार उचलला, तर सुखही सर्वांच्या वाट्याला येतं. मग सुखदुःखाचं मूळ नाहीसं होतं !

७. 'निर्भयतेची वाटचाल'

आपले व्यवहार पूर्वी वस्तूंच्या विनिमयानं,देण्याघेण्यानं चालत होते. काळाच्या ओघामध्ये अशा बऱ्याचशा वस्तूंच्या रूपातल्या देण्याघेण्याची जागा पैशानं घेतली. स्वाभाविकपणे त्याची व्याप्ती वाढली. जगात जर देणंघेणं हे अपरिहार्य राहाणार असेल, तर पैसा आणि तो मिळवणं - यांचं स्थान माणसांच्या जीवनात राहाणार, यात काही शंका नाही.

त्यामुळं नोकरी असो, व्यवसाय असो, शेती असो - त्यांचा महत्त्वाचा शेवट, अखेर ते सारं किती पैसा देऊ शकतं, यात होणार, हे उघड आहे. त्यामुळं अनेकांना पैसा मिळण्याची मोठी चिंता पडलेली असते. ती आपण समजू शकतो. पण तो कमी मिळाला तर काय होईल, अपुरा तर पडणार नाही ना - असं भय अकारण असतं, हे अनेकदा, नीट विचार केल्यावरच पटू शकतं.

खरं तर पैसा मिळतो, तो कष्ट करण्यानं. आपल्याला असं म्हटलं तर धाडसाचं वाटेल, की 'पैसा कष्टांचा गुलाम आहे!'

अर्थात हे गृहीत आहे की, कष्ट नीट लागतील, कौशल्याचे लागतील, नित्यनेमानं करावे लागतील. अनुभवापोटी काही कष्ट, कुठल्याही क्षेत्रात थोडे वायाही जातील. कष्टाच्या मानानं पैसा, कदाचित थोडा कमीजास्त मिळेल. पण पैसा गुलाम आहे, हे खरं!

'आपण मालक, कष्ट मालक!' यात मालकीचा अहंकार नाही, ती 'वस्तुस्थिती' आहे! त्यामुळं,आधी म्हटलं तसं, आपण मालकासारखं राहून, कष्ट करावेत. पैशाची चिंता करण्याचं कारण नाही.तो मिळेल की नाही,याचं भय बाळगण्याचं कारण नाही! कारण

पैशाची चिंता करणं, म्हणजे 'आपण पैशाचा गुलाम' होण्यासारखं आहे ! कुठल्याही क्षेत्रात झालं तरी गुलाम होणं, अगदी कुणा सामान्यालाही, मनापासून नक्कीच आवडणार नाही. मग आपण पैशाचं गुलाम का व्हावं ?

हे नुसतं याच क्षेत्रात नाही. अनेकांना परीक्षेतल्या यशाची, गुणांची चिंता वाटते. अभ्यासाच्या काही विषयांचं भय वाटतं. त्यांनी हे जरूर लक्षात घ्यावं, की अभ्यास तर करावा लागेल. मार्गदर्शन घ्यावं लागेल. पण यशाची भीती का बाळगावी ? कारण पक्क्या अभ्यासाचं, यश हे गुलाम आहे ! आपला अभ्यास पक्का असेल, तर यशाला आपल्या मागून यावंच लागेल. तीच गोष्ट परीक्षेतल्या गुणांची आहे !

विनोबांच्या लहानपणची गोष्ट प्रसिद्ध आहे. बालपणी, घरी रात्री तेलाचे दिवे घेऊन, या खोलीतून त्या खोलीत जावं लागे. कधी अभ्यासासाठी दिव्यासमोर बसावं लागे. एकदा त्यांच्या लक्षात आलं, की आपल्या मागं,भिंतीवर काही मोठी, काळी आकृती वावरते आहे. त्या वयाप्रमाणं, त्यांना तो कुणीतरी अक्राळविक्राळ राक्षस वाटला !

दिवा घेऊन, ते घाबरून आईजवळ गेले.

आईनं विचारलं,'तू कशाला घाबरला आहेस', त्यांनी त्या भिंतीवरच्या राक्षसाकडं बोट केलं.

आई म्हणाली,'अरे तो राक्षस नाही, त्याला सावली म्हणतात. भिंतीवर ती तुझ्यापेक्षा केवढीतरी मोठी दिसते. म्हणून तुला भय वाटलं. पण एक लक्षात घे, की ती सावली तुझी गुलाम आहे. इतकंच नव्हे, तर तुझ्या आज्ञेप्रमाणं, तिला वागावं लागेल.तू बसलास की, तिला बसावं लागेल, तू उठलास, तर उठावं लागेल. नोकराला

किंवा गुलामाला का कधी मालकानं घाबरायचं असतं?'

विनोबांनी तो प्रयोग करून पाहिला. त्यांच्या लक्षात आलं की, ते उठले की सावली उठत असे, ते बसले की ती बसे. त्यांनी हात उचलला की ती हात उचले. ती त्यांची गुलाम आहे, तो कोणी घाबरवणारा राक्षस नव्हे हे त्यांना पटलं आणि त्यांच्या आयुष्यातलं हे भय कायमचं गेलं !

आपल्या आयुष्यातसुद्धा असे अनेक नोकर आणि गुलाम असतात. ते ओळखावे लागतात. कारण, ते मालक भासतात. अशा नोकरांचं, गुलामांचं भय आपल्याला वाटत असेल, तर विचार करावा, की आपण मालक आहोत! माणूस आहोत! मालक म्हणून कष्टांत कमी पडू नये. पण, अकारण भीतीही बाळगू नये.

मग असली काल्पनिक भयं हद्दपार होतील आणि आपल्याला स्वास्थ्य लाभेल. आपलं जीवन सहज आणि अधिक यशस्वी होईल. जीवन म्हणजे 'निर्भयतेची वाटचाल' ठरेल !

८.'हातांचं चीज'

आपण मनुष्य म्हणून बुद्धिमान आहोत, निसर्गानं आपल्याला अनेक देणग्या दिल्या आहेत, यात शंकाच नाही. त्यांच्या वापरासाठी अत्यंत प्रगत असा मेंदू आपल्याकडं आहे. आपल्याकडं एखादी गोष्ट असणं वेगळं आणि तिच्या क्षमतांची जाणीव असणं, त्यांचा प्रत्यक्ष वापर करून ध्येय साधणं-हे मात्र त्याहीपेक्षा वेगळं आहे.

म्हणूनच,माणसाला मिळालेल्या, पण दुर्लक्षित असलेल्या, अशा अनेक संधींविषयी विचार करण्याची मोठी गरज आहे. पण, माणूस एवढा बुद्धिमान असूनही, या साऱ्या देणग्यांचा आणि क्षमतांचा विचार करणारी, उपयोग करून घेणारी माणसं शोधायला गेलं, तर मात्र ती त्यामानानं खूप दुर्मिळ असतात. म्हणून, स्वतःच्या जन्माचं चीज करणाऱ्या आणि इतरांचं भलं करणाऱ्या, त्यांतल्या एकेका देणगीचा थोडक्यात विचार करूया.

त्यासाठी इतर प्राण्यांना मिळालेल्या देणग्या आणि माणसाला मिळालेल्या देणग्या, यांमधल्या फरकाकडं तरी निदान लक्ष असावं. ते दिलं तर असं आढळेल, अनेकदा प्राण्यांना निसर्गानं झुकतं माप दिलं आहे की काय, असं वाटतं. जन्म तर, माणसाच्या बाळाचाही होतो आणि एखाद्या गायीच्या वासराचाही होतो. पण माणसाचं हे बाळ उभं राहायला, किती महिने घेतं हे आपल्याला माहीत आहे. तेच,गायीचं वासरू जन्माला आल्याबरोबर, काही तासांत स्वतःच्या पायांवर उभं राहातं, चालतं. काही तास आणि अनेक महिने, यांतली तफावत, देणगी म्हणून केवढी मोठी आहे! त्यावेळी, माणूस कमी पडतो आहे की काय, असंच वाटेल. पण निसर्गाची रचना खूप दीर्घदृष्टीची असते. वासरू लवकर चालतं खरं, पण त्या चार पायांवरच. बाळ

उशिरा चालतं खरं, पण दोन पायांवर, तेही आयुष्यभर ! प्राण्यांतल्या चार पायांपैकी दोन पाय बाळाचे हात होतात, जे त्याला आयुष्यभर साथ देतात. त्याला कितीतरी विलक्षण कार्यं, केवळ त्या हातांमुळं करता येतात. माणसाच्या हातांतल्या इतर चार बोटांपेक्षा, खूप वेगळ्या दिशेनं फिरून कोणतीही कामं करायला मदत करणारा अंगठा,ही तर विलक्षण देणगी आहे!

हेच हात शेती करून माणसाला स्वावलंबी करतात. हेच हात डोक्यातले विचार,कल्पना,संशोधनं - लेखणीनं कागदावर उतरवतात, शेकडो वर्षं लोकांना आनंद देणारी चित्रं कुंचल्यांनी रेखाटतात, विलक्षण वास्तू-शिल्प कोरतात, मूर्ती घडवतात, पेटीवर-तबल्यावर-तंतुवाद्यांवर लीलया फिरून कल्पनातीत आनंद देतात. ज्याला उपजीविकेचं साधन मिळालं नाही, बुद्धीची-प्रकृतीची साथ मिळाली नाही, त्याला मदत मिळवून द्यायला उपयोगी पडतात, ते, हे हातच !

हातांच्या देणगीचा विचार करावा ! बुद्धिमान माणसाला, याचा किती उपयोग करता येण्यासारखा आहे ! हातांनी कष्टानं स्वावलंबन साधणं, गरजूला निरपेक्षपणे अन्न-पैसा-पाणी देणं, दुःखितांचे अश्रू पुसणं,थंडीनं कुडकुडणाऱ्याला पांघरूण घालणं,कधी कौतुकाचा, कधी धीराचा प्रेमळ हात पाठीवर ठेवणं, दुर्दैवानं हात न लाभलेल्यांच्या मुखी घास भरवणं, अशा सार्थकाच्या अनेक संधी देणाऱ्या,देवाचे आभार मानण्यासाठी तेच हात कृतज्ञतेनं जोडणं-असे जीवनाचे सार्थक करणारे हातांचे अनेक उपयोग करता येतील !

हे किंवा असं खूप काही त्या हातांनी केलं असेल, तर असं म्हणता येईल की, या हातांच्या देणगीची जाणीव आपल्याला आहे आणि तिचं काही चीजही आपण केलं आहे !

९.'दानाचं वळण'

माणसाला मिळालेल्या अनेक दुर्मिळ देणग्यांतल्या, हातांच्या देणगीचा विचार आपण करतो आहोत. आजवर अनेक संशोधकांनी अविश्रांत कष्ट केले. न्याय, व्याकरण, राजनीती, इतिहास, खगोल,गणित - इथंपासून ते सूक्ष्म अनुभवगम्य सृष्टिनिर्माता, आत्मज्ञान-अशा असंख्य विषयांवर ज्ञान संपादन केलं. त्याचा उपयोग होतो आहे, तो याच मानवी हातांनी ते उतरवून ठेवल्यामुळं!

छपाईची कला नसताना, अनेक महत्त्वाच्या ग्रंथांच्या शेकडो पानांच्या प्रती, याच हातांनी लिखित स्वरूपात काढल्या गेल्या, जतन केल्या गेल्या. यांतल्या काही विषयांचं ज्ञान, हे जसं शब्दांनी उतरवलं जाऊ शकलं, तसंच ते अनेकदा बिंदू, आकृत्या, संख्या, भूमिती - अशा इतर अनेक प्रकारांच्या साहाय्यानं उतरलं जाऊ शकलं, ते या हातांच्या देणगीमुळंच !

टंकलेखन, संगणक असले तरी, पुन्हा त्यावर काम करतात ते, हे देणगी मिळालेले हातच! एखादं हजारपाचशे वर्षांपूर्वीचं, पिसाच्या, बोरूच्या, टाकाच्या साहाय्यानं लिहिलेलं, पाचपाचशे पानांचं हस्तलिखित पाहिलं की, ही हातांची देणगी काय करू शकते, याची थोडी कल्पना येईल. मग या हातांबद्दल कृतज्ञताही वाटेल आणि त्याचे अनेक विधायक उपयोगही लक्षात येतील.

यात एक थोडी गंमत, लक्ष देऊन निरीक्षण करण्यासारखी आहे. बाळ जन्माला येतं, ते या हाताच्या मुठी मिटून येतं. थोडं मोठं झालं की बोटं उघडतात, पण हाताच्या बोटांत सापडलेली वस्तू, ते घट्ट धरून ठेवतं.सहसा दुसरी वस्तू मिळाल्याशिवाय,हातांत धरलेली

पहिली वस्तू सुटत नाही !

पुढं मनुष्य मोठा होतो. पण, या हाताच्या देणगीची, खऱ्या विधायक उपयोगाची जाणीव नसली तर, या लहानपणच्या प्रवृत्तीत आणखीच भर पडते. पुढं, तो घेतलेली वस्तू तर सोडत नाहीच, पण दुसरी मिळालेलीही घेतो. लहान मूल, निदान दुसरं काही हातांनी पकडल्यावर तरी पहिलं टाकतं, मोठं माणूस दुसरंच काय, तिसरं-चौथं मिळालं तरी सगळंच ठेवून घेतं आणि त्यापुढच्याची वाट बघतं. मग घराला घर, फ्लॅटला फ्लॅट, जमिनीला जमिनी - मनुष्य हातांत काय काय धरून ठेवील, याची कल्पना करणं कठीण आहे !

वास्तविक, हात जसे गरजेला घेण्यासाठी आहेत, तसे ते गरजेला देण्यासाठीही आहेत. घर, शिक्षण, ज्ञान, पैसा, वस्तू, अन्न, पाणी - सारं हातांनी घ्यायचंच असतं, ते फारसं शिकावं लागत नाही. पण द्यायचं मात्र शिकावं लागतं! त्याचा अभ्यास करावा लागतो ! त्यातही पुन्हा हातांना 'दान' द्यायचं तर शिकवायचंच आहे,पण त्याहीपेक्षा त्यांना 'त्याग' शिकवायचा आहे! त्याग म्हणजे, चालताचालता हातातली वस्तू दिल्यानंतर, आपल्या मार्गानं पुढं कायमचं निघून जाणं आहे, त्यागानंतर पुन्हा मागं वळून पाहाणं नाही! तर दान मात्र, दिल्यानंतर कदाचित थांबणं, मागं वळून पाहण्यासारखं आहे! असं पाहाणं कदाचित आभार, प्रसिद्धी - अशा स्वरूपाचं आहे! हा अभ्यास गरजेचा असला, तरी वाटतो तेवढा सोपा नाही! संचयानं जगात उत्पन्न होणाऱ्या दुःखावरचा, दान-त्याग, हा उतारा आहे!

अनेक साधू भिक्षेच्या निमित्तानं जाऊन, या सद्‌गुणाची सवय त्यात्या घरातल्या हातांना लागावी, म्हणून काय सोसतात, ते जरूर

पाहावं. एकदा एका गृहिणीच्या दारात भिक्षेला उभं राहिल्यावर, तिनं रागारागानं हातानं नकार दिला. दुसऱ्या दिवशी ते पुन्हा शांततेनं भिक्षेला आले. त्याच रागानं तिनं चुलीतली गरम राख यांच्या हातांवर टाकली. दोन्ही दिवस ते पाहणाऱ्या शेजारच्या सद्‌गृहस्थांनी साधूंना विचारलं,'तिचे हात तुम्हाला हे काय देत आहेत! तरी तुम्ही शांतपणे पुन्हा भिक्षेसाठी येण्याचे कष्ट का घेत आहात?'

साधू शांतपणे म्हणाले,'बिचारीच्या हातांना निदान घेण्याची सवय लागली आहे. आत्ता ती 'द्यायला शिकते' आहे! दानाची सवय लागेल, त्यावेळेला तिचंच कल्याण होईल!'

एके दिवशी त्या शेजारच्या सद्‌गृहस्थांनी पाहिलं की, ती गृहिणी साधूच्या झोळीत भिक्षेचे दाणे टाकीत होती! शेजारच्या त्या सद्‌गृहस्थांकडं पाहात ते म्हणाले,'ती दान द्यायला हळूहळू कसं शिकते आहे, ते तुम्ही पाहात आहात ना!'

हातांना लागणारं दानाचं हे वळण, नक्कीच जगातली दुःखं हलकी करणारं आहे !

१०.'विधायक निवड'

माणूस एकदा जन्माला आला की, निसर्गाच्या क्रमानं तो हळूहळू मोठा होत जातो. अन्नपाण्यासारख्या काही गोष्टी कमीजास्त असल्या तरी, निसर्ग त्या सांभाळून घेत असतो आणि त्यासाठी सर्वसाधारण माणसाची वाढ थांबत नाही. त्याच्या वाढीत, त्याच्या हातापायांपासून डोक्यापर्यंत त्याला वाढवण्याचं काम, निसर्ग नियोजनानं आणि प्रमाणबद्धतेनं करीत असतो. लहान मुलाच्या अवयवांचं एकमेकांशी जसं जेवढं प्रमाण लहानपणी असतं, तसंच ते, तो वाढला तरी, त्या प्रमाणातच वाढवलं जातं. आपल्या शरीरातल्या असंख्य यंत्रणांची - अगदी नाजूक वाहिन्यांपासून कठीण अशा हाडांपर्यंत, सर्वत्र नियोजन आणि प्रमाण राखून, निसर्गानुकूल वाढ होते.

पण यात अगदी केंद्रस्थानी असलेली, एक मोठी वाढ निसर्गानं आपल्यावर सोपवली आह! ती महत्त्वाची आहे - अशासाठी की, निसर्गानं नियोजनानं आणि प्रमाणानं केलेल्या वाढीनं, आपण एकवेळ शरीरानं मोठे होऊ, पण 'लहान माणसाचे', 'मोठे माणूस' होऊच असं नाही !

आईवडील, एखादं भावंडं, एखादा मित्र, एखादे शिक्षक - एवढं लहान असलेलं संबंधांचं वर्तुळ, माणूस मोठा झाला तरी, तेवढ्याच पाचसात जणांपुरतं मर्यादित राहू शकतं. तो मोठा होईल तसं ते मोठं होतंच, असं नाही! कारण, आता ते निसर्गाचं काम नाही. अनेकांचं हे वर्तुळ, मोठे झाले तर मित्राऐवजी ऑफिसमधला सहकारी,धंद्यातला पार्टनर,आयुष्यातला जोडीदार आणि शिक्षकाऐवजी

साहेब किंवा मालक - असं पुन्हा तेवढंच मर्यादित राहातं !

ते तसं असायला हरकत नाही. पण माणुसकीचा विकास व्हायला, एकतर त्याला स्वतःच्या अंतरंगात खोल जावं लागतं, ते अवघड असतं. नाहीतर, मग हे संबंधांचं वर्तुळ जाणीवपूर्वक, गरजेनुसार विशाल करीत, प्रत्येक माणसाबरोबर काहीतरी नवीन शिकत जावं लागतं. संबंध जर चार भिंतींपुरते मर्यादित राहिले तर, माणूस कदाचित वयाबरोबर, शरीराबरोबर पदानं-पैशानं मोठा होईल, पण समजुतीनं संकुचित आणि लहान राहातो.

अशी समजुतीची वाढ माणसाच्या इतर असंख्य प्रकारच्या माणसांशी,त्यांच्या प्रवृत्तींतल्या-विचारांतल्या-कल्पनांतल्या विविध, वेळी टोकाच्या तफावती शिकण्यातून, होत असते. तशीच वाढ, निसर्गाच्या विलक्षण विविध असलेल्या जगाच्या संपर्कातूनही होत असते. त्यात गवताच्या काडीपासून शेदोनशेवर्षं जगणाऱ्या महाकाय वृक्षांपर्यंत वैविध्य असतं,तसंच पायाखालच्या धुळीपासून,अवकाशातल्या हात न लागणाऱ्या आकाशापर्यंतही सर्व विविधता असते. ते सारं शिकल्यानं मनुष्य नुसताच शरीरानं मोठा होत नाही तर, मनानं आणि समजुतीनंही मोठा होतो !

याचा फार मोठा लाभ असा की, कुठल्याही परिस्थितीतल्या, कुठल्याही वयाच्या, कुठल्याही प्रवृत्तीच्या माणसाबरोबर त्याला जुळवून घेता येतं आणि आपला जीवनप्रवास तर चालू ठेवता येतोच, पण त्याच्याबरोबर इतरांना मदत करता येते आणि जगालाही काही देऊन जाता येतं ! आपण 'मोठे' झालो, आपल्याला लागणारं 'आपल्याकडं' आहे, म्हणून जगाकडं दुर्लक्ष करण्याची, त्याबद्दल बेपर्वा राहण्याची घातक प्रवृत्ती उरत नाही!

ती घातक अशासाठी आहे की, अशा शरीरानं, पैशानं मोठ्या झालेल्या, पण मनानं-समजुतीनं लहान राहिलेल्या माणसांवर येणाऱ्या प्रसंगांत मदत करायला जवळचं माणूससुद्धा उत्सुक नसतं, टाळतं. त्याचबरोबर एकमेकांच्या मदतीनं, विशाल समजुतीनं वाढणाऱ्या समाजातल्या अनेक विधायक कामांत, त्याबरोबर वाढणाऱ्या माणुसकीतही, अशा संकुचित राहिलेल्या माणसांमुळं अडथळा निर्माण होतो! विकासाची गती मंदावते !

मनानं मोठं होऊन, आपल्या आणि जगातल्या माणुसकीच्या विकासाला, आपण गती द्यायची की ते न करता, याच माणुसकीच्या प्रवासाला अडथळा बनून, एक दिवशी निघून जायचं, हे आता आपणच ठरवायचं आहे !

यांतली 'विधायक निवड' उघड आणि सोपी आहे !

११.'पाहाणं आणि पारख'

माणूस जग पाहातो ते मुख्यतः डोळ्यांनी. अगदी लहानपणापासून जवळपासची माणसं, वस्तू, घरंदारं, पशुपक्षी, झाडं - असा हा पाहण्याचा परीघ वाढत जातो. अशी प्रत्येकाच्या पाहण्यानं त्याच्या मेंदूत दाखल होणाऱ्या माहितीची मोजदाद मेंदूच करू जाणे !

पण, वाढणाऱ्या माहितीबरोबर दाखल होते ती-'मला हे माहिती आहे' असं वाटत जाण्याची, 'मी'पणाची प्रवृत्ती ! ते इतकं नकळत दाखल होतं की, एखादं सातवीआठवीतलं मूलसुद्धा तिसऱ्याचौथीतल्या मुलाबरोबर बोलताना ज्या बढाया मारतं, त्या पाहाव्यात! पुढं बारावीतलं मूल, या आठवीतल्या मुलासमोर नकळत तेच करीत असतं !

माहिती वाढत जाणं, हे नैसर्गिक असलं तरी, मीपणाला खतपाणी घालणारं, हे त्याबरोबर वाढणारं, 'मला माहिती आहे', असं वाटत जाणं अनावश्यक आणि हानिकारक आहे. प्रत्येक क्षेत्रांत डोळ्यांनी असं किती पाहिलं, साठवलं तरी, हे सबंध जग, त्याच्या मेंदूत कधीच दाखल होऊ शकणारं नाही, हे ओळखणं सावधानतेचं आहे. अहंकार टाळणारं आहे !

त्यानं होणारं नुकसानही, जागं राहून टाळलं तर, आपल्या कृतीही बरोबर होतात आणि इतरांनाही त्यातून न्याय आणि चांगल्या प्रेरणा, आपल्याला देता येतात. कारण, डोळ्यांनी पाहिलं तर, माणसाचं बहिरंग दिसेल, त्याच्या स्वभावाचा अंदाज लागेल, पण केवळ त्यावर विसंबून, मतं बनवणं आणि तसा व्यवहार करणं, हेही

टाळण्यासारखं नुकसान आहे !

माणसाचे स्वभाव, त्याचे हेतू, त्याच्या अडचणी - यांचा अंदाज अशा साध्या डोळ्यांनी करता येत नाही. त्यासाठी, त्याचं अंतरंग पाहण्याची सूक्ष्म दृष्टी लागते. त्याचबरोबर, दुसऱ्याचं कल्याण व्हावं, ही हितबुद्धी, त्यासाठी झळ सोसण्याची तयारी, त्यासाठी वाट पाहण्याची सबुरी - या साऱ्या मनुष्यजीवनातल्या मौल्यवान गुणांची ओळख आणि अभ्यास लागतो !

रफी अहमद किडवई हे नाव स्वातंत्र्यप्राप्तीच्या दरम्यानच्या काळातल्या लोकांना परिचित असेल. एक राजकीय कैदी म्हणून त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला होता. माणसाचं अंतरंग - त्याच्या अडीअडचणी ओळखणारी, अशी विधायक, सूक्ष्म नजर त्यांच्याजवळ होती.

एक गृहस्थ एकेदिवशी त्यांच्याकडं ओळखीचं प्रमाणपत्र मागायला आले. रफीसाहेबांनी त्यांना ओळखीचं आणि कामासाठी शिफारस करणारं पत्रही दिलं! ते पाहणाऱ्या, जवळच्या एका अधिकाऱ्यानं विचारलं,'या माणसाला चोरीच्या गुन्ह्याखाली तुरुंगवास झाला आहे. त्याला आपण ओळखलं नाही का?'

रफीसाहेब म्हणाले,'तो आणि मी एकाचवेळी तुरुंगात होतो. मी राजकीय कैदी असल्यामुळं माझ्या वस्तू, रोजचं जेवणाचं ताट - सारं आणून देण्याचं काम, योगायोगानं याच व्यक्तीकडं, साधा कैदी या नात्यानं होतं. त्याला कमी प्रतीचं जेवायला मिळत असे. पण एकदाही त्यानं माझ्या ताटातली एकही वस्तू, चांगली म्हणून चोरली नाही ! लक्षात घ्या, हे ओळखलं पाहिजे की, बाहेर त्याला कष्टाची संधी, साधं अन्न - जर मिळालं नाही, तर त्यानं चोरीशिवाय काय

करावं? डोळ्यांनी पाहून, त्याला नुसतं चोर ठरवून चालणार नाही !

त्याचा स्वभाव, हेतू यांची पारख केली, तर लक्षात येईल की, तो मुळात चांगला आहेच. थोड्या विश्वासानं त्याला मदत केली, त्याच्यासाठी कदाचित थोडं नुकसान सोसलं, तर उलट तो भविष्यात एक चांगला नागरिक होईल !'

आपण डोळ्यांनी पाहावं, माहिती जरूर साठवावी, पण तिचा अहंकार वाटू देऊ नये. कारण, न पाहिलेलं आणि न पाहाता येण्यासारखं जग फार मोठं आहे ! त्याची जाणीव न ठेवता आपण पाहातो आहोत तेवढ्याच जगावरून आपण सगळ्याची किंमत ठरवायला लागलो तर, अहंकाराबरोबरच इतरांवर अन्यायही घडत जातील, संबंध दुरावतील. आपणच अपरिपक्व ठरू.

डोळ्यांना दिसावंच, पण गरजेचं असलेलं खूप काही त्यांना दिसत नाही, हेही दिसावं ! जे दिसतं आहे, त्यातसुद्धा परिपक्वता येऊन दुसऱ्याचं कल्याण करता येण्याएवढी डोळ्यांना पारख यावी, कारण त्यातच आपली खरी माणुसकी आहे !

१२.'मनुष्यजीवनाची पहाट'

माणसाचा जन्म श्रेष्ठ आहे. हे नैसर्गिक सत्य आहे. दोन पायांवर उभं राहाण्यापासून मेंदूपर्यंतच्या असंख्य गुंतागुंतीच्या आणि अत्यंत कार्यक्षम यंत्रणा माणसाचं श्रेष्ठत्व दाखवून देतात. वाघसिंहासारखे किंवा हत्तीसारखे प्रचंड प्राणी पाहाता, त्यांच्यापुढं तो शरीरानं, शक्तीनं श्रेष्ठ आहे, असं म्हणणं, धाडसाचं वाटेल. उलट तो त्यांच्यापुढं दुबळाच आहे. तरी त्यांनाही पिंजऱ्यात अडकवणारा, साखळदंडानं बांधून ठेवणारा माणूस, श्रेष्ठ ठरतो तो, अर्थातच शरीराच्या ठेवणीवर नव्हे.

इतर प्राण्यांना, स्वतःच्या संरक्षणासाठी नखांपासून शिंगांपर्यंत अनेक गोष्टी निसर्गानं दिलेल्या आहेत. त्या स्वरूपाचं काहीच नसतानाही, निसर्गानं माणसाला त्याच्या एवढ्याशा मेंदूमध्ये खूप प्रगत कल्पना, विचार आणि शक्ती दिल्या आहेत. त्यामुळं प्राण्यांजवळ असे विघातक अवयव असूनही, तो मेंदूच्या वापरानं-युक्तीनं, प्राण्यांना आटोक्यात आणू शकतो. स्वतःचं संरक्षण करू शकतो. इथंपर्यंत ठीक आहे, पण असं आढळेल, की या पलीकडं जाऊन, तो त्यांचा विलक्षण संहारही करू शकतो !

प्राणीही संहार करतात. पशूंचं जीवन तर एकमेकांच्या संहारावर चालतं. पण त्यांचा संहार 'जगण्यासाठी' असतो. माणसानं केलेला संहार, मात्र 'विचार करायला लावणारा' असतो. या प्राण्यांना आटोक्यात आणणं, स्वतःचं संरक्षण करणं - या निसर्गानं दिलेल्या रास्त कामांपलीकडं तो जातो. माणसाचा तोच मेंदू आता त्याच ईश्वरी जिवांना राबवून स्वतःचं मनोरंजन करून घेतो. त्यासाठी तो

सर्कस उभारील, प्राण्यांना नाचायला लावील, वेळी त्या निरपराध जिवांची शिकारही करील!

निसर्गानं माणसाला मेंदूची विलक्षण शक्ती दिली आहे, हे खरं. पण त्यामुळंच त्यावर विचार करण्याची आणि त्याच्या वापराला विधायक दिशा देण्याची गरज, मनुष्यजीवन असेतोपर्यंत, कायम राहाणार आहे ! हाच माणसाचा मेंदू अनेक दिशांनी विधायकपणे चालून, स्वतःसाठीच नव्हे, तर सृष्टीतला श्रेष्ठ घटक म्हणून प्राणी, पशू, पक्षी, झाडंपेडं अशा सर्वांसाठी सुखसोयी निर्माण करू शकतो. पशुपक्ष्यांसाठी जंगलं आरक्षित ठेवू शकतो, वाढवू शकतो. प्राण्यांसाठीचे नदीकाठ, पाणवठे यांचंही रक्षण करू शकतो. पशूंसाठी कुरणं ठेवू शकतो, पक्ष्यांना दाणापाणी देऊ शकतो. हे कायद्यानं करण्यापेक्षा, माणसानं उत्स्फूर्तपणे करण्यात, त्याची माणुसकी आहे ना ?

पण यांतल्या किती कामांची जाणीव माणसांना होते ? निसर्गाचेच घटक असलेल्या एकमेकांसाठी, काही करायचं असतं, याची जाणीव असलेले लोक आपल्याला किती प्रमाणात आढळतात, हा आपणच विचार करण्यासारखा प्रश्न आहे. कारण हे सारं जीवन जाणण्याची शक्ती ही आपल्यातच आहे ना ? कधीतरी सहज आंबा, पेरू, चिक्कू, सफरचंद, डाळिंब - अशी असंख्य फळं देणाऱ्या झाडांचं, कृपा करून निरीक्षण करावं. ते नक्की आपल्याकडून काय घेतं, आपल्याला काय देतं, एवढा विचारही आपल्याला जागृत करायला पुरेसा ठरेल !

माणूस जगण्यासाठी इतक्या प्रकारचं अन्न घेतो आहे, की त्याची गणना करणंही कठीण आहे. त्याच वेळी तुलनेनं पाहावं, की

ही फळं देणारी झाडं नुसतं पाणीच घेत आहेत. फळझाडांनी मात्र त्यांना जेव्हा मिळेल तेव्हा, कोणी देईल तेव्हा, नुसत्या पाण्यावर राहावं, वाढावं आणि अमृतासारखी फळं देत राहावं ! आपण मात्र ती फळंच नव्हे, तर अन्नपाणी, भाजीपाला, कंदमुळं, पानं-अशा असंख्य गोष्टी हव्या तेवढ्या, हव्या तेव्हा पिकवाव्यात, खाव्यात, जगावं, वाढावं ! कुठल्या झाडाला, ते पितं ते नुसतं, पाणी तरी आपण घालतो आहोत का, याचा विचारही माणसाच्या मनात येऊ नये, याला अन्यायाखेरीज काय म्हणता येईल ?

यावर विचार केला, तर माणसाचं जीवन 'जगण्यासाठी' आहेच, पण ते 'जगवण्यासाठीही' आहे, याची जाणीव होऊन, कुठंतरी 'खऱ्या मनुष्यजीवनाची पहाट' होईल !

१३.'माणसाला माणसाची गरज सदैवच'

एक आलिशान बंगला होता. हिरवळी, बागा, फुलांचे ताटवे, गेट लॅम्प्स्, आत मोठं पोर्च - या साऱ्यानं त्या बंगल्याला एखाद्या छोट्या राजवाड्याचाच दिमाख आणला होता. आत जाणारी येणारी आलिशान गाडीच फक्त अनेकांनी पाहिली होती. बंगल्याचे मालक त्या गाडीतून उद्योगाला जातातयेतात, एवढंच अनेकांना माहीत होतं. त्यांना त्याअर्थानं कुणी, कधी फारसं पाहिलेलं नव्हतं. कारण, त्या बंगल्याच्या कंपाउंडच्या भिंतीसुद्धा पुरुषभर उंचीच्या होत्या. त्यात वर काटेरी कुंपण !

त्या बंगल्याच्या शेजारी काही झोपड्या होत्या, छोटी घरं होती. कुणाच्या दारात शेळ्या होत्या, कुणी मजूर-कामगार होते. एक रिक्षावाले होते. त्यांची रिक्षाही स्वतःची नव्हतीच. ती ते भाड्यानं घेऊन चालवीत असत. आत सर्व सुबत्ता असल्यामुळं, बंगल्याच्या व्यवस्थेसाठी आत जाणाऱ्या गडी, माळी अशा माणसांव्यतिरिक्त कुणाची ये-जासुद्धा नसे. या साऱ्या मोठेपणाबद्दल, आजूबाजूच्या घरांतल्या माणसांची कधी एकत्र बसले म्हणजे चर्चा होई. ते म्हणत, आपण गरीब माणसं. आपलं हातावरचं पोट. त्यांना आपली काय गरज असणार ?

एक दिवशी मात्र बंगल्याशेजारच्या झोपडीतल्या माणसाला बंगल्यातून काही ओरडण्याचा, विव्हळण्याचा आवाज आला. शेजारचा रिक्षावाला नेमका घरात होता. त्यालाही आला. दोघं घराबाहेर पडले, बंगल्याच्या गेटजवळ आले. पण आपल्याशी फटकून वागणाऱ्या, आपली गरज नसलेल्या अशा बंगल्यात, प्रवेश करावा

की नाही, अशा विचारानं ते गेटजवळ घुटमळले.

पण दुसऱ्या क्षणी आतला आवाज अधिक वाढला. मग मात्र त्यांनी गेट उघडलं. समोर पाहतात तर, ते श्रीमंत गृहस्थ छातीवर हात ठेवून, मोठमोठ्यानं विव्हळत बंगल्याच्या पायरीवर येऊन पडले होते. यांना बघून, त्याही परिस्थितीत त्यांनी, 'या, या' अशा खुणा केल्या. या दोघांच्याही गांभीर्य लक्षात आलं, ते पटकन पुढं गेले. त्यांची पत्नीही घरात नव्हती, सबंध आवारात चिटपाखरूही नव्हतं. ते गृहस्थ कसेबसे हात जोडत म्हणाले,'मदत, मदत. दवाखाना..' दोघांतल्या एकानं त्यांना छातीशी सावरलं. रिक्षावाले पटकन बाहेर गेले, रिक्षा आणली. आणखी एका माणसाला मदतीसाठी हाक मारली. तिघांनी मिळून, तातडीनं त्यांना गावातल्या सर्वांत मोठ्या हॉस्पिटलमध्ये नेलं.तिथले डॉक्टर्स त्यांना ओळखत होते. त्यांनी जुजबी माहिती घेतली. ताबडतोब तातडीचे उपचार सुरू केले.

सुटीचा दिवस म्हणून गावाला गेलेली त्यांची पत्नी, रात्री उशीरा परत आली. तोवर जवळचे इतर शेजारी गेट बंद करून बंगला राखत बसले होते. त्यांच्याकडून ही बातमी कळताच, त्या तातडीनं हॉस्पिटलकडं गेल्या. तिथं बाहेरच्या बाकड्यावर रिक्षावाले आणि त्यांच्याबरोबरचे दोन शेजारी पाचसहा तास ताटकळत बसलेले दिसले. तेवढ्यात आतून आलेल्या मुख्य डॉक्टरांनी त्यांना म्हटलं,'तुम्ही भाग्यवान आहात. गरजेला हे शेजारी धावले नसते आणि इथं येण्यात वेळ गेला असता तर, पेशंट वाचणं कठीण होतं !'... 'हीच ती शेजारची माणसं. गरीब म्हणून आपण त्यांची कधी दखलही घेतली नाही, उलट फटकूनच वागलो. असं असतानाही तीच माणसं माणुसकी दाखवून आपल्यातलाच मोलाचा जीव वाचवायला

तत्परतेनं पुढं आली..' असे अनेक विचार मनात येऊन बाईंच्या डोळ्यांत पाणी तरळलं. रिक्षावाले आणि त्या शेजाऱ्यांना त्यांनी मूकपणे हात जोडले !

'गरज'..! माणसाला माणसाची मूलभूत असलेली गरज ! आता ती वाटणं आवश्यक असूनही, दुर्मिळ होत चाललेली आपल्याला दिसेल. त्यामुळं, माणसांच्यात इतरांबद्दल बेपर्वाई, तुच्छता, आपलंआपलं राहण्याची वृत्ती - यानं माणुसकीचा दुष्काळ पडत चाललेला दिसेल. ज्ञान, पैसा, वस्तू - अशा खऱ्यातर अनेक चांगल्या गोष्टींनीच, माणसाला दुसऱ्याची गरज दुर्दैवानं, वाटेनाशी झाली. मग निसर्ग कधीतरी ती गरज दाखवून देतो.

पण जबाबदार माणूस म्हणून, निसर्गाला हा त्रास न देता, आपणच प्रत्येकाला दुसऱ्याची गरज आहे, हे ओळखून वागू शकलो तर, त्यात माणुसकीचं चीज आहे आणि प्रत्येक संकटाला मार्गही आहे !

१४.'अवनतीचा मंत्र'

जगभर अनेक मंत्र प्रचलित आहेत. तसे मंत्र म्हणजे काही अक्षरंच असतात. फक्त त्यात त्याच्यामागं काही तपश्चर्या, चिंतन,विचार, दिशा - असं असतं. त्यामुळं त्या शब्दांना, तसल्याच नेहमीच्या शब्दांपेक्षा, अधिक सामर्थ्य प्राप्त होतं. 'यत्न हाच देव' असा मंत्र माणसाला कार्यशील करतो, उत्साह देतो. काळानुरूप माणसाला चांगल्या कामांना अशा मंत्रांनी प्रेरणा दिली आहे. अलीकडच्या काळात 'भारत छोडो', 'जय जवान, जय किसान' अशा मंत्रांनी देशव्यापी विधायक कामं केली आहेत.

असे मंत्र माणसाच्या प्रगतीला जसे कारणीभूत ठरतात, तसे त्याच्या अधोगतीला-अवनतीला कारण ठरणारे काही मंत्रही, दुर्दैवानं प्रचलित झाले आहेत, असं लक्षात येईल. ते ओळखण्यासाठी म्हणा किंवा सावध होण्यासाठी म्हणा, अशा प्रचलित झालेल्या मंत्रांनी, आपलं नुकसान होतं आहे. याकडं लक्ष गेलं तर, अशी अवनती टाळायला त्याचा नक्की उपयोग होईल.

जिथं उत्पादन होतं, त्याची विक्री होते, खरेदी होते, त्यावेळी तिथं, अशा तऱ्हेची त्या उत्पादनाच्या दर्जाची अवनती होऊ नये, तो खाली येऊ नये, म्हणून 'दर्जा नियंत्रण-क्वालिटी कंट्रोल' अशा स्वरूपाचे विभागही काम करतात. पण, अशी अवनती ही काही एका विशिष्ट उत्पादनापुरती मर्यादित नाही.

अवनती माणसाच्या व्यक्तिगत जीवनात नव्हे तर, समाजात आणि शेवटी देशात - सर्वत्र हानी करणारी गोष्ट आहे. त्याचं मूळ अर्थातच, माणसांच्या मनाला बेसावध करणाऱ्या, अलीकडं नकळत

प्रचलित झालेल्या एका मंत्रात दिसेल. असंख्य क्षेत्रांत माणसांची कामं, उत्पादनं, व्यवहार, संबंध - यांच्या अवनतीला कारणीभूत होणारा हा मंत्र म्हणजे 'त्याला काय होतंय?'

माणूस खोलीत काम करीत बसलेला असेल, काम संपलं म्हणून किंवा दुसऱ्या कामासाठी जावं लागलं म्हणून, तो खोलीतून बाहेर जातो, तो कदाचित तासदोनतासानं परत येतो किंवा तसाच इतर कामाला बाहेर गेला तर संध्याकाळीही परततो. खोलीत काम करताना आवश्यक असलेले दिवे आणि फॅन मात्र तसेच सुरू असतात!

बाहेरून आल्यावर बातम्या बघायला टीव्ही लावला जातो. पाचदहा मिनिटं पाहून मनुष्य जरा चहाला म्हणून जातो, तो तिथंच नाश्ता-पाणी-गप्पा यांत तासतासभर रमलेला असतो. इकडं टीव्ही सुरू असतो. समोर कुणीही नसतं. याची कुणी सावध माणसानं आठवण केली की, या मंत्राचं पठण होतं, 'त्याला काय होतंय?'

त्या व्यक्तीच्या परिस्थितीनुसार कदाचित, कुणीही नसताना सुरू राहिलेल्या अशा ट्यूब, फॅन, टीव्ही, इतर उपकरणं - यांच्या होणाऱ्या अनावश्यक वापरानं, त्यावर वाया जाणाऱ्या विजेनं काही फरक पडत नसेल. त्याचं बिलंही त्याच्या दृष्टीनं नगण्य असेल. पण हा मंत्र जेव्हा घरोघरी जपला जाईल, त्यावेळी एका राष्ट्रीय संपत्तीची केवढी हानी होत असते, याची कल्पना येईल.

मग विजेचा तुटवडा, भारनियमन, दरवाढ-अशा अवनतीच्या असंख्य अवस्थांना, सगळ्यांनाच सामोरं जावं लागतं. त्यावर तक्रार करण्यापेक्षा, असा अवनतीचा मंत्र मनाकडून चुकून म्हटला गेला तर,सावध होणं आणि त्यात्या वेळेला तीती हानी वेळीच थांबवणं, हे

आपल्याच कल्याणाचं आणि फायद्याचं नाही का ?

वापरानंतर न लावलेलं पेनाचं साधं टोपण शाई वाळवून टाकतं, आपलीच पुढं गैरसोय होते. पत्राला-मेसेजला न दिलेलं उत्तर अकारणच गैरसमज निर्माण करतं. कुणा उपकारकर्त्याचे वेळीच न मानलेले आभार कुणाला तरी नकळत दुखवून जातात. आपलं काम झाल्यावर पुन्हा जागी न ठेवलेली वस्तू, आपल्यालाच पुढच्या गरजेच्या वेळी शोधाशोध करायला लावते. नोंदवून न ठेवलेली माहिती, महत्त्वाचा पत्ता, फोन नंबर, अचानक पडणाऱ्या गरजेच्या वेळेला, आपल्याला चार ठिकाणी चौकशी करायला लावतो. अशा साध्या गोष्टी व्यवहारात अडचणी, गैरसोयी निर्माण करतात. तर अनेकदा, माणसांच्या संबंधांनासुद्धा अवनतीची कळा आणतात !

प्रेरणा देणारा मंत्र, आठवणीत ठेवून, जशी प्रगती साधता येते, तसा 'त्याला काय होतंय?' असला मंत्र आठवणीत न ठेवता,कटाक्षानं टाळून अवनतीही वाचवता येते ! त्यात आपलंही कल्याण आहे, समाजाचंही आणि देशाचंही !

१५.'भूमिकेतला आनंद'

एक गृहस्थ काही वस्तूंच्या खरेदीसाठी नेहमीच्या दुकानात गेले. काऊंटरवरच्या मुलाच्या वडिलांपासूनचे ते ग्राहक. त्यांना वस्तू देताघेताना तो म्हणाला,'बाबा आतल्या केबिनमध्ये आहेत. भेटणार असलात तर या आत..'

ते खुशीनं म्हणाले,'मी तुला ते आत्ता विचारणारच होतो. कारण..'

त्यांना थांबवीत तो म्हणाला,'..तुमचं दुकानात काही नुसतं खरेदी हे काम नसतं. बाबांची भेट हे त्याहीपेक्षा महत्त्वाचं काम असतं, असंच ना!' असं म्हणून, त्यानं काऊंटरशेजारचं गेट उघडून त्यांना आत सोडलं. 'छान, छान..' म्हणत ते गृहस्थ आतल्या खोलीकडं गेले.

आत प्रवेश करताना, समोर खुर्चीत निवांत बसलेल्या, त्या मुलाच्या वडिलांना ते म्हणाले,'काय आत येऊ का मालक?'

आतले ते वयस्कर वडील म्हणाले,'मालक नाही, मालकांचे वडील! तसं म्हणालात तर, आत यायला परवानगी आहे'.

त्यांच्यासमोर खुर्चीवर बसता बसता हे म्हणाले,'तुमचं बुवा पहिल्यापासून काहीतरी वेगळंच असतं. तुम्ही तर चाळीस वर्षं दुकानाचे मालक!'

ते म्हणाले,'यांतलं थोडं खरं आहे. चाळीस वर्षं मी दुकान चालवलं, ही गोष्ट खरी, मालक होतो हेही खरं. पण आता गेल्यावर्षी मी हे दुकान मुलाच्या नावावर करून दिलं ना, आता तो मालक ! म्हणून तुम्ही आला आहात,ते आता 'मालकांच्या वडिलांच्या' भेटीला

आला आहात !'

ते गृहस्थ म्हणाले,'ते कायद्यानं काहीही असेल, म्हणून काय, दुकान तुमचं नाही की तुम्ही दुकानाचे मालक नाही?'

हे वृद्ध गृहस्थ हसत म्हणाले,'तुम्हाला माझा स्वभाव माहिती आहे. हे दुकान आमच्या मुलाचं आहे आणि तो त्याचा मालक आहे. आता सारं नफा, नुकसान, गिऱ्हाईक, संबंध, उलाढाल - सगळं त्याचं आहे. महिन्याभरात दोन गिऱ्हाइकं गेली, पण आणली त्यानं चार नवीन! कधी गिऱ्हाइकांशी कुरबुर होते, कधी हसतखेळत व्यवहार चालतो !'

ते गृहस्थ थोड्या अविश्वासानं आणि संदेहानं म्हणाले,'बरं बुवा, तुम्हाला हे जमतं!'

हे वृद्ध मालक म्हणाले,'तुमचे आमचे गुरू एकच आहेत ना? त्यांनी आपल्याला काय सांगितलं आहे? त्यात्या वेळची आपली भूमिका ओळखा आणि त्यानुसार सहजपणे जगा. आनंदात राहाल. त्यांच्या कृपेनं ते जमतंय आणि त्यामुळं आनंदही आहे!'

आलेले गृहस्थ म्हणाले,'तुम्ही व्यापारात राहून परमार्थ साधला. आम्ही गुरूंच्या शेजारी राहून, रोज देवाला जाऊनसुद्धा आम्हाला तो साधला नाही. तुम्हाला हे जमलंय. आता आमच्या डोक्यावर हात ठेवा म्हणजे झालं !'

दोघंही हसले आणि तोपर्यंत वेळेवर आत आलेला चहा घेतला.

हा खरा साधा सोपा कुणालाही, कुठंही साधण्यासारखा व्यवहारातला परमार्थ आहे-'आपली त्यात्या वेळची भूमिका ओळखा आणि ती मनापासून करा!' हे सांगणं साधं वाटलं तरी, त्यात सहजता

आहे. ते निसर्गाला अनुकूल आहे आणि त्यामुळंच ते आनंद देणारंही आहे. कारकुनानं कारकुनासारखं, साहेबानं साहेबासारखं, नोकरानं नोकरासारखं, मालकानं मालकासारखं, पतीनं पतीसारखं, पत्नीनं पत्नीसारखं, शाळकरी मुलानं अभ्यासू मुलासारखं - वागणं हे सहज असतं.

पण या भूमिका ओळखल्या नाहीत, केल्या नाहीत किंवा दुसऱ्यांच्या भूमिका केल्या, तर मात्र त्रास होतो, अकारण दुःख होतं. कुठं निष्कारण रेंगाळायला होतं, कधी कुठं लुडबूड होते, कधी स्वतःची कर्तव्यं-भूमिका करायच्या राहून जातात. जन्माला आल्यापासून अशा असंख्य भूमिका वाट्याला येत असतात, बदलत असतात. त्यात्या भूमिका जीव ओतून केल्या तर, कुठं अडकायलाही होत नाही, चित्त मोकळं राहतं.

मग शेवटी हलक्या मनानं प्रत्येक टप्प्यावरून जात, जगाचा अलगद निरोप घेता येतो. मात्र त्यासाठी, आपली भूमिका त्यात्या वेळी ओळखून केलेली असावी !

१६.'विधायक अस्वस्थता'

आपण माणसं आहोत. मोठ्या भाग्यामुळं 'माणसाचं जीवन' आपण जगतो आहोत ! इतर जीवनंही खरंतर, आपल्या जवळ जगली जातात. आपण गाय-बैल पाहतो, शेळ्या-मेंढ्या पाहतो, कुत्रं-मांजर पाहतो, अगदी किडामुंगीही पाहतो. तीही जगतात. जिवंतपणात त्यांच्यात आणि आपल्यात कुठला फरक आहे, असंही मानण्याचं कारण नाही. आपल्याला न दिसणारी साधी किडामुंगी, आपल्याला जेव्हा छोटासा चावा घेते, त्यावेळेला न दिसणाऱ्या, अशा जीवनातही, जिवंतपण तितकंच वावरत असतं, हे लक्षात येतं !

त्याअर्थानं मनुष्यजीवनात एवढं भाग्याचं काय आहे, त्याची कल्पना एकेक विचार करीत गेलं, तरच येण्यासारखी आहे. माणसाच्या हातून चुकून कुठं साखरेचा कण पडला, तर सबंध घरात आपल्याला न दिसणारी एकच नव्हे तर, अनेक मुंग्या काही मिनिटांत कुठून गोळा होतात आणि तो कण पोट भरण्यासाठी किती दूरवर सुरक्षित ठिकाणी वाहून नेतात! डायनिंग टेबलवर बसून आपल्याला हवे तसे आणि हवे तेवढे पदार्थ मागवून, घरी किंवा उपाहारगृहात जेवणाऱ्या माणसाच्या जेव्हा हे लक्षात येईल, तेव्हा कदाचित त्याला त्याच्या वाट्याला आलेल्या भाग्यातली एकेक गोष्ट लक्षात येऊ लागेल!

दारात शिळ्याताज्या पोळीभाकरीच्या तुकड्यासाठी तासभर आतल्या माणसांकडं आशेनं पाहत,उभं असलेलं कुत्रं दिसेल. भुकेच्या वेळी कुणी कडबा टाकेल का म्हणून, तासभर वाट पाहणारेगाय-बैल दिसतील, स्वयंपाकघरातली मालकीण दुधाचं पातेलं तसंचठेवून

बाहेरच्या खोलीत गेली का, याची खात्री करून घेण्यासाठी दुधाच्या आशेनं खिडकीतून तीनतीनदा डोकावून बघणारं, भुकेलेलं मांजर दिसेल, कोवळ्या पानांच्या आणि फळांच्या शोधात रोज उठून दोनदोन चारचार मैल भुकेपोटी हिंडणारी वानरसेना दिसेल, तेव्हाही एरवी लक्षात न येणाऱ्या अनेक गोष्टी लक्षात येऊ लागतील.

आपल्याला हवं त्या प्रकारचं अन्न 'आपण' पिकवतो.स्वतःच्या पोटापाण्याची व्यवस्था आपली आपण करू शकतो. अन्नांचे प्रकार, चवी, शिजवणं, भाजणं, उकडणं - अशा अनेक प्रक्रिया आपण स्वतः करीत असतो. आपल्याला हवं तसं, हवं तेवढं अन्न, हवं तेव्हा आपण खात असतो. हॉटेलमध्ये सांगितलेली थाळी यायला वेळ झाला की, वेटरवरच काय, त्या हॉटेलच्या मालकावरही रागावतो. घरी आईवर, पत्नीवर रागावतो. चव मनासारखी झाली नाही, तिखटमीठ कमी जास्त झालं, की करणाऱ्यांचा राग येतो.

विचार करावा, भूक सहन होत नाहीशी झाली म्हणून, गोठ्यातली गाय-म्हैस किंवा बैल ओरडला तर, गोठ्यातल्या बैलाला, पहिल्यांदा रागानं ओरडणं मिळतं, मग पाठीवर काठी मिळते, मग असेल तसा कडबा! तासभर दाराशी बसल्यानंतर,तोंडावर फेकलेली पोळी घेऊन कुत्रं पळत निघालेलं असलं,तरी लांबूनसुद्धा त्याला अचूक दगड मारणारे लोक कमी नाहीत! एका अन्नासारखा विषय आहे, तर मनुष्यानं, आपल्या मनुष्यजन्माचं मोठेपण, भाग्य ओळखलं आहे, असं म्हणता येईल का? जर ओळखलं तर, कुठल्याच अन्नदात्यावर - मग ते घरातलं माणूस असो, हॉटेलमधले वेटर असोत - उशीर झाला म्हणून काय किंवा आंबट, खारटझालं म्हणून काय, आतून ओरडावसं वाटणार

नाही,जे,जेवढं मिळेल,त्यात समाधानी राहाणं अवघड जाणार नाही !

या दिशेनं पाहात गेलं, तर निदान इतर जिवांकडं बघून तरी, माणसाला किती विलक्षण प्रकारच्या देणग्या आणि सामर्थ्य दिलं आहे, याची जाणीव होईल. ती जाणीव ठेवून, आपण माणसामाणसांच्यातला व्यवहार तरी करतो का,याचा विचार अस्वस्थ करील! अशी अस्वस्थता, एकमेकांशी होणारे व्यवहार तर अधिक समजूतदार करीलच, पण इतर प्राणी-पशुपक्षी यांच्या जगाशी होणारे व्यवहारही नक्की अधिक चांगले करील.

अस्वस्थता, ही एरवी फारशी स्वागतार्ह गोष्ट नाही. आपण आधी पाहिलं तसं मनासारखं अन्न, प्रकार, चव मिळाली नाही, यानंही अस्वस्थता येते, त्यातून राग येतो, कुणाला टाकून बोललं जातं. त्याअर्थानं आता आपल्याला मिळालेल्या देणग्यांचा आपण विचार केला, तर असल्या कारणांसाठी येणारी अस्वस्थता स्वागतार्ह नाही. तशी ती येऊही नये.

पण आपल्याला माणूस म्हणून मिळालेल्या देणग्या आणि सामर्थ्य यांचा विसर पडून, जो व्यवहार आयुष्यभर घडतो आहे, त्याची जाणीव झाली, तर भानावर येण्यासाठी लागणारी अस्वस्थता, ही मात्र स्वागतार्ह आहे, उलट जरूरीचीच आहे !

सगळ्याच अस्वस्थता वाईट नसतात, उलट काही अस्वस्थता गरजेच्या असतात, विधायक असतात ! मग आत्ता उल्लेख केल्या तशा अस्वस्थता याव्यात, असंच वाटेल आणि अशा 'विधायक अस्वस्थता'च आपलं जीवन उन्नत करतील !

१७.'दृष्टिदोष..!'

'दृष्टिदोष' असा शब्द वापरला की, साधारणपणे माणसाच्या मनात काही कल्पना सहज येतील. डोळ्यांत काही दोष असेल, डोळा अधू असेल, नजर कमी असेल, दुर्दैवानं डोळ्यांत फूल पडलेलं असेल, तिरळेपणा असेल आणि त्याबद्दल आपण हे बोलत असू. पण हे दोष आपल्या इथल्या संवादाचा विषय नक्कीच नाहीत. असे दोष तर, मूळ डोळ्यांतले आणि निसर्गाच्या काही रचनेमुळं, काही उणिवांमुळं दुर्दैवानं कुणाच्या वाट्याला आले असतील तर, त्याबद्दल आपल्याला सहानुभूती वाटावी, वाईट वाटावं, मदत करावीशी वाटावी.

आपण विचार करतो आहोत, तो असा डोळ्यांशी निगडित असलेला विषय असला तरी, तो या डोळ्यांच्या अवयवाशी निगडित नाही, मनाशी निगडित आहे, दृष्टीशी निगडित आहे. डोळे असणं वेगळं, दृष्टी असणं वेगळं.

आपण एक साधं उदाहरण पाहू. आपण अनेक जणांनी रांगोळ्या पाहिलेल्या असतील. असा एक अनुभव आपल्याला आला आहे का, हे कृपा करून आठवून पाहावं. एखादी मोठी रांगोळी काढलेली असते. ती विस्तारत जाताना तिची शेवटची टोकं पानांसारखी एकदुसऱ्याशी जोडलेली असतात. आपण त्या रांगोळीकडं, त्यांतल्या रंगांकडं पाहिलं की, पहिली प्रतिक्रिया सहज आनंद देऊन जाते.

दुसऱ्या क्षणी जोडलेल्या त्या साठ पाकळ्यांपैकी, चुकून जोडायच्या राहिलेल्या एका पाकळीकडं पटकन लक्ष जातं.तसं पाहिलं

तर, अजून या पाकळ्या साठ आहेत, सत्तर आहेत की ऐंशी आहेत, हे कुणी मोजलेलं नसतं. पाहिलेलं नसतं. त्या रांगोळीमधल्या विस्तारत जाणाऱ्या आकारात खूप कला, खूप सौंदर्य असतं, रंगसंगती असतात. त्यातलंही काही अजून पाहिलेलं नसतं. ते सगळं एवढं पाहण्यासारखं असताना, अजून पाहायचं असताना, त्याआधी या एखाद्या चुकीकडं दृष्टी जाते खरी. नंतर बाकीचं सगळं चांगलं पाहिलं तरी, ती न जोडलेली पाकळी लक्षात राहते.

त्यामुळं अनेकदा असं होतं, एवढी रांगोळी काढणाऱ्या त्या कुणा कलाकाराला धन्यवाद देणं, आनंदानं दाद देणं - अशा सद्भावना वाढवणाऱ्या, कितीतरी चांगल्या गोष्टी करायच्या राहून जातात. कौतुक केलंच, तर ते जसं मनापासून व्हावं तसं घडत नाही, थोडं वरवरचं राहातं. कारण, आत कुठंतरी डोळ्यांनी दाखवून दिलेली ती उणीव, ती चूक तशी अकारणच घोटाळत असते. काहींना दुसऱ्यांच्या श्रमांचं कौतुक नसलं तर, असले दोष तिथल्या तिथं दाखवून, ते अकारणच त्या कलाकारालाही नाउमेद करून जातात.

डोळ्यांचं काम तर, त्यांच्या कक्षेत येईल ते दाखवून देण्याचं असतं. त्यामुळं, हा दोष तर त्यांचा नाही. तो पाहणाऱ्याच्या दृष्टीचा म्हणजे, त्याअर्थानं 'दृष्टिदोषाचा' असतो. मनाला ज्या अनेक खोडी आहेत, त्यांतल्या एकातून तो उद्भवतो. ही गोष्ट जर वेळेत लक्षात आली नाही, तर तो 'दृष्टिदोष' न उरता, तो माणूसच हळूहळू 'दोषदृष्टी' होऊन बसतो !

म्हणजे असं की, पाहिलेल्या संबंधातल्या, समाजातल्या, जगातल्या अगणित चांगल्या गोष्टी दिसूनही, अशा दोषदृष्टीच्या माणसांना,त्यांतले असे कुठंकुठं राहून गेलेले दोषच जाणवत राहतात.

मग त्यांना खूप कष्ट घेऊन, खूप वेळ स्वयंपाकघरातल्या शेगडीचा, ज्वाळांचा, तापलेल्या तव्यांचा, भांड्यांचा, धुराचा त्रास सहन करून तयार केलेल्या, नव्या पदार्थाचा आनंद घेता येत नाही. त्या कष्टांचं कौतुक करता येत नाही. उलट, त्याचा वासच थोडा वेगळा आहे, तो किंचित तुरटच आहे, असल्या नाउमेद करणाऱ्या प्रतिक्रिया त्यांच्याकडून दिल्या जातात. त्यामुळं कौतुकानं येणारा उत्साह तर हे करणाऱ्याला वाटतच नाही, उलट आपण एवढे कष्ट आणि वेळ उगाचच घालवला, असं वाटतं.

आपल्या माणसासाठी म्हणून, चार दुकानं हिंडून आणलेल्या कपड्यालत्त्याची किंमत न वाटता, त्यातल्या शेडमध्ये, डिझाइनमध्ये दोष दिसतात. याच्याऐवजी थोडं असं पाहिजे होतं-तसं पाहिजे होतं, असं वाटतं. अशानं, अशी दोषदृष्टी माणसं स्वतःही आनंदात राहात नाहीत आणि दुसऱ्यालाही आनंदात ठेवू शकत नाहीत.हे तसं आयुष्यभर थांबतच नाही.

करणाऱ्यानं काम निर्दोष करणं हे आदर्श असतं. पण, कुणी न विचारता इतरांनी दोष दाखवणं, हिताचं नसतं. आपले संबंध ते बिघडवतं. त्यापेक्षाही दोष पाहण्याची विघातक प्रवृत्ती आपल्यात निर्माण करतं. म्हणून, आपली कर्मं निर्दोष व्हावीत यासाठी कष्ट करावेत, हे तर गरजेचंच आहे. पण, इतरांच्या कर्मांतले दोष कळण्याइतपत आपण जाणकारही जरूर असावं.

मात्र 'दोषदृष्टीची' सवय लावणारा 'दृष्टिदोष' आपल्यात नसावा. तो नसला म्हणजे आपला आणि आपल्या संबंधातला आनंद टिकेल, वाढेल !

१८.'आदर्श गोष्टींतला विधायक क्रम'

आयुष्यात अनेक गोष्टी आदर्श असतात, चांगल्या असतात. आरोग्याचे नियम,आहारविहाराच्या गोष्टी - समजून घेतल्या तर, कुणाही व्यक्तीला त्यापासून लाभच होतो. त्यामुळं स्वाभाविकपणे, अशा अनेक आदर्श गोष्टी माणसं आचरतात. इतरांपर्यंत पोचवतात. ते उपयोगी आहेच. इतरांना ते कळण्यानं, त्यांचाही लाभच होणार असतो !

मात्र, आचरणशील माणसाला हे सांगायचा अधिकार जरूर असला तरी, या अनेक आदर्श गोष्टींमधली हीसुद्धा एक आदर्शच गोष्ट असते की, कुणाला, काय आणि केव्हा सांगावं ! याचं महत्त्व लक्षात आलेलं नसलं तर मात्र, गोष्टी चांगल्या असूनसुद्धा माणसांचं नुकसान होऊ शकतं. तसं तर, गाडीही उपयुक्त, घोडंही उपयुक्त ! ते घोडं ज्यावेळेला गाडीच्या पुढं जोडलं जातं, तेव्हा दोनही गोष्टी उपयुक्त ठरतात. आदर्श असतात. पण हेच घोडं गाडीच्या मागं असलं तर, दोनही गोष्टी उपयुक्त असूनही, त्यांतला आदर्श क्रम न कळल्यानं, दोन्हीही निरुपयोगी ठरतात.

किशनगंज नावाच्या गावातली गोष्ट आहे. त्याकाळी जमीनदारी होती. ते जमीनदार म्हणजे छोटेछोटे पण समजूतदार राजेच असत. एक दिवशी एका जमीनदारांचा मुलगा ऐन उन्हातून घरी आला, तो आजारपण घेऊनच. त्याला येत असलेली चक्कर, त्याची होत असलेली तळमळ पाहताच, जमीनदारांच्या लक्षात आलं की, याला काहीतरी वैद्यकीय उपाय लगेच केले पाहिजेत. सुदैवानं, त्यांच्या वाड्यासमोरून एक वैद्य चालत जाताना त्यांना दिसले. त्यांना

हाक मारताच ते आत आले. वडिलांनी त्या मुलाची अवस्था त्यांना दाखवली. त्याची नाडी पाहून ते रागारागानं म्हणाले,'कडक उन्हात तू काहीतरी उद्योग करून आलेला दिसतो आहेस!'

मुलगा प्रामाणिकपणे म्हणाला,'होय. मी कैऱ्या तोडायला हिंडत होतो.'

त्यावर आणखी चिडून ते म्हणाले,'तुम्ही आजकालची मुलं अशीच बेजबाबदार वागता. इतकं ऊन्ह बघून, निदान थोडंतरी डोकं चालवायचं! खावा आता कैऱ्या..!'

ते ऐकत असलेल्या वडिलांनी, त्यांचं म्हणणं तिथंच थांबवलं आणि हात जोडून म्हणाले,'क्षमा करा वैद्यजी. आमचे नेहमीचे वैद्य थोड्या वेळात येतातच आहेत. भावानं त्यांना आधीच निरोप दिला आहे.' हे वैद्य निघून गेले. पाच मिनिटांत त्यांचे नेहमीचे वैद्य आले. तेवढ्यात, हे सगळं पाहणाऱ्या आणि ऐकणाऱ्या, त्या मुलाच्या आईनं आश्चर्यानं विचारलं,'तुम्ही असं कसं काय केलं?'

त्याचे ते जमीनदार वडील म्हणाले,'लक्षात घे, औषध तर आवश्यकच आहे. त्यांनी सांगितलेली गोष्टही आदर्श आहे. पण अशा प्रसंगी चार प्रेमळ शब्द आणि आधार यांची आधी गरज असते. त्यानंच माणसाला निम्मं बरं वाटतं. आता तू पाहा !'

तेवढ्यात त्यांचे वैद्य आत आले. त्या मुलाकडं बघून म्हणाले,'एवढ्या उन्हात असं होणारच. तुम्ही मुलं कैऱ्या तोडत हिंडणार नाही, तर काय आम्ही हिंडणार आहोत? काही काळजी करू नकोस. थोडंसं औषध दिलं की होऊन जाईल बरं!' मुलाच्या चेहऱ्यावर एकदम हलकं वाटल्याचा आणि आनंदाचा भाव निर्माण झाला.

कधी कुणाच्या हातून काम करताना चूक होते, कुणाला परीक्षेत गुण कमी पडतात. अशावेळी उपदेश देण्यापेक्षा, आधी समजुतीचा दिलासा देण्याची गरज असते. नंतर चूक दुरुस्त करता येते. अभ्यास वाढवायची उमेद येते. निर्दोष असणं, चांगले गुण पडणं, त्यासाठी उपदेश करणं - हे सगळं आदर्श असतं. समजुतीचा दिलासा आणि उपदेश या दोन्ही गोष्टी आदर्श आहेत, गरजेच्या आहेत. पण त्या याच क्रमानं केल्या तर विधायक ठरतात. उपदेश आधी आणि दिलासा नंतर, असा क्रम समजला नाही, चुकला तर, नुकसान होतं.

म्हणून चांगल्या गोष्टी माहिती तर असाव्यातच, पण त्या सांगण्यातला विधायक क्रम माहीत असला तर, दुसऱ्याला उत्साह येतो आणि मूळ कामं करण्याचं उद्दिष्टही जरूर साध्य होतं !

१९.'आनंदाचं शिक्षण स्वतःतच !'

कुणाही माणसाला आपण आनंदात असावं, असं वाटतं. आनंदाच्या कल्पना वेगवेगळ्या असल्या तरी, आनंदित असणं म्हणजे काय, त्याचा अनुभव जवळजवळ सर्वांचा सारखाच असतो. काहीवेळा आनंदाच्या दिशा चुकल्या, तो भ्रामक असला तर, अनुभवाला आल्यावर मनुष्य ते सोडूनही देतो. त्याला हेही कळतं की, शिक्षण घेऊन नाही, पैसा साठवून नाही, कुठं भ्रमण करून नाही, कुठली सत्ता मिळवून नाही, लौकिक असूनही आनंद नाही - त्याअर्थी आनंद नक्की कशात आहे, हे विचार करणाऱ्याला थोडं कोडं वाटणारी गोष्ट आहे.

खरा आनंद मिळतो, तो समजुतीनं, निःस्वार्थानं, कर्तव्यानं, ऐक्यानं, निरहंकारानं, निरपेक्षतेनं ! मात्र, या साऱ्या आनंद देणाऱ्या गोष्टी स्वतःतच आहेत. इतरांचा संबंध तर येणारच. जग, माणसं, वस्तू, घटना - हे सगळं घडत राहणार, आपल्याशी जोडलेलंही राहणार. पण आनंद मिळवायचं शिकायला, त्या जगाकडं जाऊन उपयोग होत नाही. त्याचं एक सोपं उत्तर, जशा आनंद देणाऱ्या गोष्टी स्वतःतच आहेत, तशा तो मिळवायला शिकण्याची व्यवस्थाही स्वतःतच आहे, हे आहे ! अडचण एवढीच आहे की, डोळ्यांपासून लांब धरलेली वस्तू सहज दिसते आणि तीच वस्तू डोळ्यांच्या खूप जवळ आणली, तर मात्र नीट दिसेनाशी होते. तशी आनंद मिळवायला शिकण्याची व्यवस्थाही फारच जवळ, म्हणजे स्वतःतच असल्यामुळं, अनेकांना ती दिसत नाहीशी होते, लक्षातही येत नाही.

आपण आपल्या स्वतःच्या शरीराच्या हालचालींचं निरीक्षण

करून पाहू. समजा, आपल्याला दुकानातून एक वस्तू आणायची आहे. ती कुठली आणावी, हे मेंदू ठरवतो. कुठं मिळेल, ते स्मरणशक्ती सांगते. हात बाहेर जायला दरवाजा उघडतात. उतरलेल्या पायरीपासून, डोळे लक्ष ठेवून, चालणाऱ्या पायांना मदत करतात.

त्या दुकानापर्यंतचा प्रवास, पाय, सारं शरीर पेलून नेऊन करतात. तिथं हव्या त्या वस्तूंची पारख, डोळे करतात. वस्तूच्या किमतीचा अंदाज करताना, मेंदू, स्मरणशक्ती मदत करते. आपल्याच हातांनी बरोबर पैसे देऊन, योग्य ती वस्तू घेतली जात आहे ना, याच्यावर एकाच वेळी आपल्या डोळ्यांचं, मेंदूचं लक्ष असतं.

पुन्हा परत येताना, चालणाऱ्या आपल्या पायांना पुन्हा आपल्या घरी जाणारा रस्ता आठवायला आपली स्मरणशक्ती मदत करते. आपले डोळे वाट दाखवतात. आपले हात, घेतलेली वस्तू घेऊन यायला मदत करतात. दुकानातून साधी एक वस्तू आणायची होती, तर त्यासाठी आपल्या शरीरातल्याच एवढ्या घटकांनी, आपापलं काम योग्य वेळी, योग्य तेवढं केलं, म्हणून ती वस्तू आपल्या घरी आली. आपणही सुखरूप परतलो.

एरवीही रोज तोंडात घेतलेला घास चावायला आपलेच दात मदत करतात, चव पाहायला जीभ मदत करते, अन्न पोटी जायला आपलाच गळा मदत करतो. अन्न पोटी जातं. तिथल्या यंत्रणा आपापलं काम करून, शरीराला लागणारं रक्त निर्माण करण्यापासून अशा पोटी आलेल्या अन्नावरच्या सर्व प्रक्रिया करतात!

अनेकांना वाटेल, यात वेगळं असं काय आणि त्याचा आनंदाशी संबंध काय ? पण विचार करावा की, यांतली प्रत्येक यंत्रणा दुसऱ्या यंत्रणेशी हळुवारपणे जोडलेली आहे. प्रत्येक यंत्रणा

आपापलं काम न कंटाळता, अपेक्षा न ठेवता करते आहे. मेंदूतल्या निर्णयाला डोळे, हात, पाय - सारे सहकार्य करतात. इतकंच नव्हे तर, तो मेंदूचा निर्णय असेल, माझा त्याच्याशी काय संबंध, असं कुणी म्हणत नाहीत.

तितकंच, दातांनी घास कमी चावला, त्याला आता मी काय करणार म्हणून, पोट तक्रार न करता, त्यांचं राहिलेलं आणि आपलं स्वतःचं - अशी सर्वं कामं करतं ! सर्वांत सहकार्य, कर्तव्य, निरपेक्षता, ऐक्य यांनी, काम निरहंकारपणे चालू असतं, म्हणून पोषण झालेलं आपलं शरीर, कामही करतं आणि वेळेला समाधीसारखा आनंद देणारी विश्रांतीही घेऊ शकतं !

कुटुंबात, समाजात तरी कामं व्हायला आणि आनंद असायला, आणखी काय लागतं? ही समजूत शिकायला, आनंदी राहायला त्यामुळंच, अर्थात कुठं बाहेर जायची जरूर नाहीच !

२०.'खऱ्या औदार्याचा आनंद !'

चांगल्या गुणांची वाढ होण्यात कष्ट असतात. पण, आनंदही मोठा असतो. गुणांसाठी वापरले जाणारे शब्द काहीसे ढोबळ, गुळगुळीत झालेले असतात. त्या शब्दांच्या अर्थाची खरी ओळख करून घेतली,तर ती आपल्यालाच उपयोगी पडणारी असते. 'औदार्य' हा त्यांतलाच एक गुण आहे. पण त्याचा अर्थ व्यापक आहे !

उदार म्हणजे कुणाच्या अडचणीला पैसा देणारा असं आपण समजतो. यातूनच, तो 'उदारहस्तानं देतो' असं म्हणणं रूढ झालं. पैसा देण्यात औदार्य आहे, हे नक्कीच. पण,अनेकदा पोट भरल्यावर, संध्याकाळचं शिल्लक उरल्यावर, मग कालची किंवा कधी आजची पोळी दुसऱ्याला देण्यासारखी,या औदार्याची अनेकदा अवस्था असते. अर्धपोटी किंवा वेळी उपाशी राहून, उद्याची भ्रांत असताना, असं अन्न देणारे आपल्याला किती भेटतात? तीच अवस्था, पैशाच्या देण्याची होते. देणं आदर्श आहे. पण ते आर्थिक सुस्थितीतलं आहे. गरजूला देत असताना, ज्याच्या हाती काही उरणार नाही, ते खरं 'औदार्य' !

खरं तर 'औदार्य' म्हणजे, याहीपेक्षा फार मोठा गुण आहे. 'औदार्य', आपले दोष ओळखण्यात आणि ते मोकळेपणानं सांगण्यात आहे! आपले गुण झाकण्यात आहे. तितकंच ते दुसऱ्याचे गुण ओळखून त्यांची प्रशंसा करण्यात आहे! आपल्या चुकांबद्दल क्षमा मागण्यात आहे,तसं ते दुसऱ्यांना क्षमा करण्यातही आहे.ते दुसऱ्यांच्या यशात, त्यांना मिळणाऱ्या लौकिकात, त्यांचं मनमोकळं कौतुक करण्यात,त्यांच्या आनंदात मनापासून सहभागी होण्यातही आहे! लहान असताना, एखादी संधी, यश मिळालेलं नसलं आणि आपल्या

मित्रमैत्रिणींना मिळालेलं असलं, तर त्यांचं अभिनंदन करण्यात, दाखवलेल्या खिलाडूपणातही औदार्य आहे !

इथं लहानपणीच्या औदार्याचा विचार आवर्जून करावा. अपयशाच्या वेळी, आपलं मूल लहान असल्यानं, नाउमेद असेल. त्याला कदाचित त्याच्यावर अन्याय झाला असं वाटेल, काहीवेळा बरोबरीच्या मित्रांबद्दल त्याला मनातून मत्सर वाटेल. त्यात त्याचं कल्याण तर नाहीच, पण त्याच्या आयुष्यात पुढंही ते होणार नाही. कारण, खऱ्या औदार्याची त्याला कल्पना नाही, ती देण्याचं काम मोठ्यांचं आहे ! मोठ्यांनी, मुलाला, ते मूल काय करतं आहे आणि त्यानं काय करावं, हे समजावून दिलं, तर त्या मुलाच्या मनाचं औदासीन्यही जाईल. इतरांचं यश, मोठेपण पाहाण्यातलं औदार्य ते शिकेल. इतकंच नव्हे,तर कदाचित परिस्थितीनं पुढं आयुष्यात, याच्या उलट घडलं, म्हणजे, तो यशस्वी झाला आणि असं कुणी बरोबरीचं अपयशी ठरलं तर, त्यावेळीही त्याला यशानं हुरळून जायलाही होणार नाही. हेच औदार्य शिकण्याची, दाखवण्याची पाळी आता दुसऱ्याची असते. पण,त्याला हे 'औदार्य' कुणी शिकवलं नसेल,तर त्याच्याकडून मनमोकळे उद्‌गार याला कदाचित ऐकायला मिळणार नाहीत. पण त्याचा राग येणार नाही. दुर्दैवानं त्याला हे 'औदार्य' शिकायला मिळालं नाही,हे समजून घेण्यात,आणखी पुढचं 'औदार्य' आहे आणि ते आता याला शिकता येईल! पण ज्याला 'औदार्याचा' खरा व्यापक अर्थ समजला असेल, त्यालाच अधिक आनंदात राहता येईल !

इथं जाताजाता एक गोष्ट जरूर लक्षात घ्यावी की, अशा व्यापक आणि हितकर औदार्याची मोठी तयार झाडं मिळत नाहीत, रोपं मिळतात आणि ती काळजीपूर्वक वाढवावी लागतात !

२१.'नित्योपासना'

माणसं साधारणपणे मोठी होतात ती, वेगवेगळे गुण संपादन करण्याचे कष्ट घेतल्यामुळं ! एखादा कष्ट करून स्वतःचं कुटुंब हलाखीतून वर आणतो. मुलाबाळांना मार्गी लावतो. काही गोष्टींना समाजात मान्यता असते. तसं शिक्षणातलं, व्यवसायातलं, शेतीवाडीतलं, नोकरीत प्रगती करून उच्च पदावर जाण्यातलं यश, कला-संशोधनातलं यश, सामाजिक कार्य, उपेक्षितांना मदत अशा वेगवेगळ्या वाटांनी जाण्यातलं यश - अशी यशंही माणसांना मिळताना दिसतात, जगात प्रतिष्ठा मिळवून देतात !

अनेक माणसांचं जीवन, लोकांना साधं वाटलं तरी, आनंदी राहूनही ते यश मिळवतात. यात एक आढळेल की, प्रत्येक यशाच्या तराजूला कधी एकच पारडं नसतं ! यशाच्या सुखाबरोबर, अनेकांना दुसऱ्या पारड्यात टाकलेल्या, अनेक दुःखांतूनही जावं लागतं. मग त्यात अपरंपार कष्ट असतील, कधी तहानभूक विसरून तासन्‌तास काम करावं लागेल, कधी त्यांना त्यांचं काम यशस्वी होत चाललं की, उघड किंवा छुप्या हेव्याला-मत्सराला तोंड द्यावं लागेल !

या सर्व प्रकारच्या माणसांत, अलौकिक माणसांचं कार्य प्रत्येकानं अभ्यासावं इतकं वेगळं असतं ! समाजाला नवीन असलेल्या, वेगळ्या समाजरचनेच्या किंवा प्रस्थापित विचारांच्या विरोधात असलेल्या क्षेत्रांत, जीव ओतून काम करणाऱ्यांना, तराजूच्या दुसऱ्या पारड्यात विरोध, अवमान, बहिष्कार, अनेकदा शब्दशः छळही - अशा कशाकशाला सामोरं जावं लागेल, हे सांगता येत नसतं.

अशा वेगळ्या वाटेवरून जाऊन, अत्यंत निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या, असामान्य माणसांनाही यांतून जावं लागतं. तरी, ते - निरपेक्षता, निःस्वार्थ अशा गुणांमुळं, दुसरं सारं पारडं पेलू शकतात. एका पारड्यात,त्यांनी केलेल्या कामाचं मोल अनेकदा,त्यांच्या आयुष्यातही त्यांना पाहायला मिळत नाही ! यातून मोठमोठे महापुरुषही सुटलेले नाहीत.

प्रस्थापित दानवी राजवटीविरुद्ध झगडून, गरीब गोपाळांना संरक्षण आणि न्याय मिळवून देणारे भगवान श्रीकृष्ण असोत, शंकराचार्यांसारखे धर्माचं पुनरुत्थान करणारे प्रज्ञावंत असोत, ज्ञानेश्वर महाराजांसारखे अलौकिक संत असोत,सॉक्रेटिससारखे प्रस्थापितांकडून शिक्षा म्हणून, मिळालेला विषाचा पेला ओठी लावणारे तत्त्वज्ञ असोत - अशांचं दुसरं पारडं खूप कष्टमय जीवनानं भरलेलं असतं.

पण त्यांच्या यशाच्या पारड्यात, त्यांनी मिळवलेल्या गोष्टी अलौकिक असतात. त्याची प्रशंसा, त्यांच्या जीवनात त्यांना क्वचितच पाहायला मिळते. त्याविषयीसुद्धा निरपेक्ष असणं, ही त्यांची दुसऱ्या पारड्यातली, फार मोठी तपश्चर्या असते! पण ईश्वरावरच्या आणि सत्यावरच्या श्रद्धेनं, ते तीही पेलतात आणि अशा अलौकिक कामांना, खरंतर, अत्यंत रास्त असलेली दाद किंवा साधी पोच मिळण्याचीही वाट न पाहाता, ते जगाचा निरोप घेतात !

आपल्या लक्षात येईल की, सामान्य माणसांना मिळणाऱ्या, सुरुवातीला पाहिल्या तशा यशामध्ये, त्यांना, त्यांच्या माणसांना सुखसमाधान, पैसा, प्रतिष्ठा, मान्यता - अशा अनेक गोष्टी मिळत असतात. त्या तुलनेनं पाहिलं तर, वेगळ्या वाटेनं जाऊन एवढा त्रास, विरोध सहन करणाऱ्यांना, सामान्य माणसाएवढंसुद्धा काही मिळत

नाही ! मग ते एवढी उपेक्षा, निर्धनता, इतके अपरंपार कष्ट, कुठल्या बळावर करीत असतील? ते बळ म्हणजे, जगाच्या कल्याणाची त्यांना असलेली तळमळ, श्रद्धा आणि आपण ईश्वरी कार्यासाठी राबतो आहोत, ही विनाअट आत्यंतिक निष्ठा ! त्यामुळं, त्यांच्या कार्याला सूर्याच्या प्रकाश देण्याइतकी सहजता असते !

जगाला शतकानुशतकं पुरणाऱ्या देणग्या देऊन जाणारे हे महापुरुष, त्यांचं जीवन आणि आपलं चौकटीतलं जीवन, यांचा अभ्यास केला जाण्याची गरज आहे. तो घडला तर असा अभ्यास आपल्या जीवनाला खोली आणि उंची देऊ शकतो !

दिवसात विशिष्ट वेळी, काही विशिष्ट गोष्टी, उदाहरणार्थ स्तोत्र, पठण, हवन, वाचन - अशी कर्मं दररोज करीत राहाणं म्हणजे पारंपरिक नित्योपासना असते. आत्ता म्हटला तसा, जगाच्या कल्याणासाठी सश्रद्धपणे, निरपेक्ष जीवन जगणं, हा शाळेबाहेरचा कालातीत अभ्यास आहे ! असा शाळेबाहेरचा अभ्यास आणि त्याचे प्रयोग, ही आपली कुणाचीही, कुठंही करावी अशी 'नित्योपासना' ठरते !

२२.'माणूस जोडावा, कार्य उभं राहातं !'

कुटुंबातली असो, समाजातली असो, कार्यं निरंतर उभी राहावी लागतात. कार्यं माणसंच करतात, पण बहुतेकांचं लक्ष, कार्यं 'साध्य' करण्याकडं असतं! ते करणाऱ्या माणसांकडं अनेकदा लक्ष नसतं! त्यावर इथं आपण थोडा विचार करू. माणसांच्या ऐक्यानं कार्यं साध्य होतात. यशस्वी होतात. त्यानं माणसाचं जीवन सुखाचं बनतं. विचार जोडलेले असले की, सहकार्य मिळतं. काम कमी वेळात होतं, सोपं होतं. एकापेक्षा जास्त माणसं असली तर, त्यानुसार त्यांच्या निर्णयांत, मतांत भिन्नता असणार. मग हे ऐक्य व्हावं तरी कसं ?

मतांत, विचारांत भिन्नता असूनही ऐक्य साधण्याची क्षमता, माणसात आहे. मोठ्या होणाऱ्या पिढीला नवनवीन परिस्थितीला सामोरं जावं लागतं. त्यासंबंधीची माहिती कदाचित मोठ्या पिढीला नसेलही! ती माहिती विचारात घेतली नाही तर, निर्णय चुकण्याची शक्यता असते. त्यामुळं होणारं नुकसान सर्वांचंच असतं. अशा प्रसंगी, अशी नवी माहिती मोठ्यांच्या कानांवर घालणं, हे जितकं मधल्या पिढीचं कर्तव्य आहे, तितकंच ती माहिती अगत्यानं ऐकून घेऊन, त्यानुसार निर्णयांत आवश्यक बदल करणं, हे मोठ्या पिढीचंही कर्तव्य आहे.

भाग्य म्हणजे, असं सारं करण्याची क्षमता माणसाला दिलेली आहे ! कार्य जेव्हा या पद्धतीनं होतं, तेव्हा घरात ऐक्य, आनंद कसा राहतो, याचा संस्कार नकळत लहान पिढीवर होत असतो. मोठेपणी तो उपयोगी पडतो. मात्र महत्त्वाचं हे की,मधल्या पिढीनं अशी माहिती

अहंभावानं म्हणा, मोठे आपलं ऐकणार नाहीत, अशा समजुतीनं म्हणा, स्वतःजवळ ठेवू नये. तितकंच, मोठ्या अनुभवी मंडळींनीही, यांना काय कळतंय, असं म्हणून, या माहितीचा अनादर करू नये.

यासाठी लागणारी सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, लहानांपासून मोठ्या पिढीपर्यंत, सर्वांचे संबंध हे जिव्हाळ्याचे, प्रेमाचे, समजुतीचे असावे लागतात. ते तसे असले तर, मग निर्णयांत सर्व जोडलेले राहतात, कुणीही त्यातला विधायक बदलही मोकळेपणानं सुचवू शकतं. निर्णय - कार्य यांपेक्षा, एकमेकांना समजून घेण्याकडं सर्वांचं लक्ष जास्त असतं ! मग योग्य निर्णय, ऐक्य, कार्य आपोआप होतं ! समाज, देश एक राहायचा तर, माणसं एकमेकांना जोडली जात आहेत ना, त्यांच्यात सुसंवाद, समजूत आहे ना - हे खरं महत्त्वाचं आहे, हे लक्षात येतं !

याद्दष्टीनं विनोबांनी एकदा वर्गातल्या मुलांच्या एका गटाला, एका कार्डावरच्या चित्राचे वेगवेगळे भाग दिले. मुलांना सांगितलं की, त्यांनी हे भाग जुळवून देशाचा नकाशा तयार करावा. मुलांना खूप धडपड करूनही ते जमेना. विनोबांनी त्यांना सांगितलं,आता हातांतले कार्डाचे सारे भाग उलट करा. ते उलटताच, त्या कार्डावरच्या चित्रांवरून, तो एक माणूस होता, हे मुलांच्या लगेच लक्षात आलं. पाच मिनिटांत त्यांनी त्या माणसाचे सारे भाग जोडून, माणसाचं चित्र पूर्ण केलं. ते चित्र विनोबांनी आता सुलट करायला सांगितलं. मुलं चकित झाली की, माणूस जोडला, त्याचक्षणी सुलट बाजूला देशाचा नकाशा तयार झालेला होता.

आपल्याला कुटुंबात ऐक्य, सुसंवाद, आनंद हवा असेल तर, तिथंसुद्धा निर्णयाच्या,ऐक्याच्या चित्राकडं लक्ष देण्यापेक्षा,कुटुंबातल्या

माणसांकडं, त्यांच्या म्हणण्याकडं, त्यांना समजून घेण्याकडं, तडजोड करण्याकडं लक्ष दिलं तर, निर्णय-ऐक्य-कार्यं आपोआप जुळून येत असतात! मग आहे तिथंच घरात काय, इतर ठिकाणी काय, सुसंवाद आणि आनंद आपोआप नांदतो !

२३.'सहनशीलतेचं मोल'

माणसाला मिळालेल्या देणग्यांत सहनशक्ती ही एक विलक्षण शक्ती आहे. आपण उदाहरणानं पाहू. तसं तर, भुकेलेल्या पशुपक्ष्यांनाही अन्नाचं मोल कळतं. पण ते केवळ भुकेची प्रतिक्रिया किंवा गरजेचं भान म्हणून !

माणसाला अशा तऱ्हेचं भुकेचं भान आहेच. पण, त्याला पशुपक्ष्यांपेक्षाही अजून अधिक भान आहे. माणसाला काळाचं आणि कल्याणाचं भान असल्यामुळं, हीच भूक कशानं भागवावी, किती भागवावी, हे तो ठरवू शकतोच, पण तसं करताना, अन्नानं भूक भागवण्याऐवजी, आरोग्यासाठी ती सहन करून, तो उपाशीसुद्धा राहू शकतो. कारण, त्यानं होणारं पुढचं कल्याण त्याला कळू शकतं. भुकेचं आणि अन्नाचं मोल त्याला आहेच, पण ते कमी घेण्याचं, वेळी न घेण्याचंआणि त्यासाठी ती भूक सहन करण्याचं सामर्थ्यही त्याच्या जवळ आहे !

सहन करण्याच्या या शक्तीचं सामर्थ्य ओळखलं तर, आयुष्य सुखाचं करणं, शांततेचं करणं आपल्याला जरूर शक्य होतं. सहनशक्ती ही एक शारीरिक बाबतीतली गोष्ट तर आहेच, पण एरवी, ताब्यात न येणाऱ्या मनालाही ताब्यात आणणारी, ती शक्ती आहे! आजारपण सहन करायला उपयोगी पडते ती सहनशक्तीच,अपयश पचवायला उपयोगी पडते ती सहनशक्तीच, अकारण होणारी लोकनिंदा, कुठला प्रतिकार न करता सहन करायला उपयोगी पडते ती सहनशक्तीच !

मनाविरुद्ध होणाऱ्या गोष्टींतही आपला तोल राखून वाटचाल

सुरू ठेवायला मदत करते तीही सहनशक्तीच ! आपण सांगूनही,हिताचं असूनही - न ऐकणाऱ्या मुलाला किंवा शिष्याला सांभाळून घ्यायला उपयोगी पडते ती सहनशक्तीच !

कित्येक वेळा सगळं व्यवस्थित ठरवून, नियोजन करून,त्यात इतरांची आवश्यक मदत घेऊन, सारं कार्य असफल होणं पाहू शकते आणि पुन्हा उमेदीनं कामाला लागायला उपयोगी पडू शकते ती सहनशक्तीच ! प्रापंचिक कामांतली अपयशंच नव्हे तर, अहंकार निर्माण होण्याचा धोका असलेली यशं पचवायला आणि तो धोका टाळायला उपयोगी पडू शकते तीही सहनशक्तीच ! कितीही कष्ट घेतले आणि भगवंत भेटला नाही तरी, त्याची, तो भेटेपर्यंत वाट पाहायला उपयोगी पडते तीही सहनशक्तीच ! आयुष्यात यशाची शिखरं गाठलेल्या अनेक लौकिक-अलौकिक महापुरुषांनी तीती यशं गाठली, त्यामागं, आपल्याला कल्पना नसली तरी, वावरत असते ती अपार सहनशक्तीच ! सहनशक्तीच्या मागं धीमेपणा, क्षमा, सबुरी, श्रद्धा, अथक परिश्रम, कल्याणाची खात्री - यांची भक्कम पार्श्वभूमी असते. म्हणून, सहनशीलता म्हणजे दुबळेपणा नसून, आपल्यातल्या ईश्वराचा तो एक प्रबळ आणि हितकर आविष्कार आहे !

लोकमान्यांना सहा वर्षांची शिक्षा आणि मंडालेला प्रतिकूल तुरुंगवास देणारा निकालही, या अलौकिक सहनशक्तीनंच ते स्वीकारू शकले. ईश्वरी न्यायाची अपेक्षा ठेवून संयमानं राहू शकले. इतकंच नव्हे, याची प्रतिक्रिया म्हणून एरवीच्या माणसानं, अन्यायाला कंटाळून, आता मी काहीच करणार नाही, अशी भूमिका घेतली असती. उलट, सहनशक्तीच्या या ईश्वरी देणगीचा वापर करून, तो काळ त्यांनी रोज दीड तास ध्यान, चिंतन,असंख्य पुस्तकांचा अभ्यास,

अलौकिक ग्रंथलेखन, जर्मन-फ्रेंच-पाली अशा भाषांचाअभ्यास - यांत कारणी लावला.

एकदा मंडालेला असह्य उष्णतेमुळं टिळकांच्या अंगावर फोड उठू लागले. वेदनांनी त्यांचा जीव घाबरा होई. अशावेळी, कैद्यांना तिथून दुसऱ्या हवेला अंदमानात पाठवण्याची पद्धत होती. त्यांनी तसा अर्ज ब्रिटिश सरकारला केला. तो अमान्य झाल्याचं त्यांना कळवण्यात आलं. तो निर्णय अन्याय्य होता, अमानुषही होता. पण ते पत्र त्यांना दाखवल्यावर, या अलौकिक सहनशक्तीच्या जोरावरच ते समाधानानं म्हणाले,'ठीक आहे. मी कैदेतच मरावं, अशी भगवंताची इच्छा दिसते !'

आपलं आणि जगाचं कल्याण करणारे जे गुण सहनशक्तीच्या सहाय्यानं मिळवता येतात, त्यांतला समता हा असाच एक मूल्यवान गुण आहे. थोर पुरुषांनी तो सहनशक्तीच्या जोरावरच मिळवलेला असतो. जेवताना एका गुरूंच्या असं लक्षात आलं की, त्यांच्यासाठी त्यांच्या शिष्यांपेक्षा चांगलं, वेगळं, जेवण बनवण्यात आलं आहे. त्याला तसं गुरूंनी बोलावून सांगितलं आणि ते आपल्या खोलीत गेले आणि त्या खोलीचं दार बंद केलं. दरवाजाबाहेर बसून त्या शिष्यानं क्षमा मागितली आणि प्रायश्चित्त म्हणून तो दरवाजाबाहेर तसाच उपाशी बसून राहिला. सात दिवस गुरू बाहेर आले नाहीत, तो जाग्यावरून उठला नाही. ते पाहणाऱ्या शिष्यांनी गुरूंना मोठ्या आवाजात प्रार्थना करून सांगितलं, 'तुमचं म्हणणं बरोबर आहे, अन्न सर्वांना समान मिळालं पाहिजे, हे आम्हाला मान्य आहे. तुमची सहनशक्ती थोर आहे. पण बाहेर आपला शिष्यही सात दिवस उपाशी बसला आहे. त्याच्यासाठी तरी आपण बाहेर यावं!' लगेच गुरू दार

उघडून बाहेर आले. म्हणाले, 'समतेचा दुर्मिळ गुण मिळवण्यासाठी एवढ्या सहनशीलतेची तरी गरज आहे ! इथून हा शिष्य गुरू होऊन बाहेर पडणार आहे. त्याच्यात आता समता रुजली आहे. भविष्यात त्याच्या शिष्यांना तो नक्की समतेनं वागवील !'

अशा या सहनशीलतेचं आणि त्यामुळं मिळणाऱ्या अशा अनेक थोर गुणांचं मोल आपण जरूर ओळखावं. त्यांची मदत घेऊन जीवनाचं ध्येय गाठावं. तेच या ईश्वरी शक्तीचं चीज ठरेल !

२४.'पाहुणचार – असाही !'

गृहस्थाश्रमी माणसाला पाहुणे नवीन नाहीत. कुटुंब छोटं असो, नाहीतर मोठं असो - कुठंही, पाहुणे येतजात असतातच. आलेले पाहुणे अडाणी, खेडेगावातले, शहरात न राहिलेले असले तर, त्यांचा पाहुणचार छोटा, थोडा - वेगळा करावा लागतो. त्यांना बाजारातल्या वेगळ्या वस्तू दाखवणं, काही प्रेक्षणीय ठिकाणं दाखवणं, छोट्यामोठ्या वस्तू घेऊन देणं, एखाददुसरा चांगला पदार्थ करून खाऊ घालणं, आपल्या घरातल्या काही नव्या वस्तू, नवी उपकरणं त्यांना दाखवणं - अशा गोष्टी हा त्यांचा पाहुणचार ठरतो !

काहीवेळा आपल्याकडं महानगरातले, संपन्न असलेले, आपल्यापेक्षा मोठे असलेले, संपन्न स्थितीत वावरणारे पाहुणेही येतात. त्यांच्या पाहुणचाराचं स्वरूप, अर्थातच वेगळं असतं. आपल्या घरातल्या वस्तूंपासून, बाहेरच्या प्रेक्षणीय स्थळांपर्यंत जवळजवळ सगळं त्यांनी पाहिलेलं असतं, त्यांना जुनं झालेलं असतं.

मग तिथं दुर्मिळ झालेली माणुसकी, जिव्हाळ्याच्या गप्पा, एकमेकांना सुखदुःख सांगण्यासाठी वेळ देणं, त्यांना आपल्या गावापासून दूर असलेल्या शांत ठिकाणी नेणं, त्यांना सहसा न मिळणारे, अत्यंत साधे पदार्थ करणं - असं पाहुणचाराचं स्वरूप बदलतं. पाहुण्यांचा मुक्कामही त्यांच्यात्यांच्या प्रकाराप्रमाणं, काही दिवसांपासून अनेक आठवड्यांपर्यंत बदलू शकतो. त्यांना येण्यात आनंद होतो, ते पाहुणचार करून घेतात आणि तो करण्यात आपल्यालाही आनंद होतो.

आपण हे लक्षात घ्यावं की, 'आजारपणं' हे असेच 'पाहुणे'

असतात, असं समजून आपण वागलो तर ? अनेकांना साधी डोकेदुखी, पित्त, सर्दी असे छोटेछोटे पाहुणे भेट घ्यायला येतात. त्यांच्याकडं बघण्याचा हा दृष्टिकोन नसला तर, माणसाला स्वतःला होणारा त्रास, त्यावेळी होतच असतो, खोळंबणाऱ्या कामांनी त्रस्त होऊन, या त्रासात आणखीच भर पडते.

या छोट्या पाहुण्यांना खरंतर, आपल्याला एकदोन दिवस विश्रांती द्यायची असते. आपल्या खाण्यापिण्यात चुकलेल्या गोष्टी नजरेला आणून द्यायच्या असतात. आपल्याला सावध करायचं असतं. ते आपण ओळखलं तर, पुढं योग्य वेळी काळजी घेऊन, आपण त्यांचं येणं टाळूही शकतो. तसं तर, एकदोन गोळ्या, किरकोळ ड्रॉप्स्, एकदोन वेळा पातळ औषध-अशा साध्या पाहुणचारावर ते खूष असतात.

तसं पाहिलं तर, सतत काम करताना, त्या नादात आपली विश्रांती घ्यायची राहून जाते. ठरवूनही रजा घालवायला नको वाटते. त्यावेळी हे छोटे पाहुणे, भले साधे असले तरी, प्रेमानं बोट धरून, आपल्याला रजा घ्यायला लावून, विश्रांती देतात. आपल्या इतर नातेवाईकांतले पाहुणे येतात, त्यावेळी आपलं नेहमीचं काम खोळंबत नाही का ? आपण ते दोनचार दिवस बाजूला ठेवतोच ना ? त्यापेक्षा फार काही वेगळं घडत नाही.

थोडा फरक आहे. ते पाहुणे आपल्या कुटुंबात येतात, त्यांचं सर्वजण मिळून आतिथ्य करतात. इथं मात्र, ज्याच्याकडं पाहुणा येतो, त्यालाच त्याचं आतिथ्य करावं लागतं. पण त्याचंही फार वाटून घेण्याचं कारण नाही. कारण, या पाहुण्यांचं इतरांवरही लक्ष असतं, प्रेम असतं. ते जेव्हा त्यांच्याकडं येतात, तेव्हा नाही का ते आतिथ्य,

त्यांचं त्यांना करावं लागत ?

हीच गोष्ट बड्या पाहुण्यांची असते. त्यांना आपल्याकडच्या गावातल्या किरकोळ गोष्टींत रस नसावा तसा,असल्या छोट्याछोट्या गोष्टींत रस नसतो. ते महत्त्वाच्या ठिकाणी भेटी देतात. कधी मेंदू, कधी हृदय ! आता बड्या पाहुण्यांसारखा यांचा पाहुणचारही मोठा असतो. मोठी रजा, मोठी औषधं, मोठी विश्रांती - त्यासाठी वारंवार तपासण्या, असं त्यांना लागतं. ते स्वाभाविकच आहे.

जवळजवळ, प्रत्येकाच्या वाट्याला कुठला तरी छोटामोठा पाहुणा येतच असतो. एरवी, माणसं त्याला कंटाळतात, त्रस्त होतात, त्रागा करतात, चिडचिड करतात, इतरांना त्रास देतात.

त्यापेक्षा, त्यांच्याकडं या दृष्टीनं पाहिलं तर, त्यांचा पाहुणचार अगत्यानं होईल आणि तसं झाल्यानं ते शांततेनं, आपला कदाचित लवकर निरोप घेतील ! निदान आपलं मनःस्वास्थ्य तरी नक्की टिकेल!

२५.'वेळ नाही..?'

अनेकांची तक्रार असते की, त्यांना खूप काही करायचं आहे, चांगलं करायचं आहे, पण त्यांना 'वेळ नाही'! कला, चित्रं, लेखन, संगीत, क्रीडा, समाजकार्य आणि असं खूप काही चांगलं करण्याच्या कल्पना असतात. पण त्यांना वाटतं, त्यांना नसतो तो त्यासाठी लागणारा वेळ !

काहींची कारणं खरी असतात. मुलांना अभ्यास, गृहिणींना घरकाम, नोकरदारांना नोकरी, दुकानदारांना गिऱ्हाइकं - अशी कारणं बरोबर असतातही. पण त्यांना काय किंवा इतरांना काय,'वेळ नाही' असं खरंच आहे का, हे आपणच ठरवावं.

यांतले अनेक जण आपल्याला कोपऱ्यावर तासभर गप्पा मारताना दिसतील, कित्येक गृहिणी दुपारी मैत्रिणींबरोबर गॅलरीतून साऱ्या अपार्टमेंटला ऐकू जाईल एवढ्या आवाजात गॅलरी ते गॅलरी गप्पा मारताना दिसतील.

नियमानं व्यायामाला जाणाऱ्या शेजाऱ्यांनी आवर्जून हाक मारली तरी आतून,'आलोच, तुम्ही पुढं व्हा!' एवढंच ऐकू येतं. हे जागे होतात. चहा होतो, पेपर संपतो. तोपर्यंत शेजारी व्यायाम करून परतही येतात. 'मी येणार होतो, पण कालच्या जागरणामुळं उठवेना, मला खरं तर नियमित यायचंय, पण 'वेळच मिळत नाही' बघा !' असं म्हणत गप्पा मारायला मात्र त्यांना पुढं वेळ असतो. अनेकांचे ख्यालीखुशालीचे फोन, ऐकणारा कंटाळला, तरी रोजसुद्धा तासन्‌तास चालतात, पण एरवी मात्र म्हणतात,'ज्ञानेश्वरी वाचायची आहे, पण 'वेळ नाही'!

त्या कला, ते व्यायाम, ती ज्ञानेश्वरी - सारं कुणालाही गरजेचं आहेच. पण निदान विचार करावा की, ज्या देवानं ऐकायला कान दिले, बोलायला जीभ दिली, तंत्रज्ञानानं फोन दिला, तासन्‌तास फोनवर बोलण्याची शक्ती दिली, परिस्थितीनं बिल भरण्याची अनुकूलता दिली, ती काय,'गरजेच्या कामांना, देवाची आठवण करायला, नाम घ्यायला' - त्याला 'वेळ नाही' म्हणून सांगण्यासाठी का? हा विचार आपणच करावा.

पण अनावश्यक माहिती, तिथं हजर नसलेल्यांची निंदा, अंमलात येऊ न शकणाऱ्या योजनांवर नुसत्याच गप्पा, कधी उखाळ्यापाखाळ्या, कधी नेटवर जगाची आपल्याला या जन्मातसुद्धा न लागणारी, पण बघूया तरी म्हणून, तासन्‌तास डोळ्यांना ताण देत मिळवलेली माहिती, अकारण इकडून तिकडं पोचवलेल्या, निरुपयोगी आणि व्याप निर्माण करणाऱ्या बातम्या, कधी बिनबुडाच्या पण गुंतवून ठेवणाऱ्या गॉसिप्स्-अशा अगणित जागा आपल्याला, आपल्या रोजच्या दिवसातला 'सापडत नसलेला तथाकथित वेळ' दाखवून देतील ! 'वेळ नाही' म्हणण्याचं पुन्हा धाडस होणार नाही !

हे पाहिलं, तर निदान सावध तरी होऊ. देह आणि वेळ याचं मोल कळेल! समजा, एखाद्याच्या घरी चोरी झाली, मुद्देमाल गेला, हे त्याला कळलंच नाही. तर जेव्हा ते त्याला कळतं, त्या दिवशी तो राजाचा रंक झाला आहे, हे कळावं, तसं अनेकांच्या आयुष्यात घडतं! 'वेळ नाही' म्हणता येतं, तसं ते अनेकजण आयुष्यभर म्हणतच असतात. पण घालवलेला वेळ मात्र आपल्याला,'आता वेळ संपली', हे एक दिवशी सांगतो. त्यावेळी खंत वाटली, तरी ते मुकाट्यानं ऐकून घेऊन, 'जगण्याच्या संधीचा' निरोप घ्यावा लागतो !

वेळ तर असतोच, पण तो सावध माणसाला ! इतकंच नव्हे, सात्त्विक गोष्टी शिकण्याची, ऐकण्याची, बोलण्याची शक्ती देणाऱ्या ईश्वराचं स्मरण ठेवण्यानं, असलेला तोच वेळ उपयोगात आणता येतो, स्वतःच्या प्रगतीसाठी वापरता येतो. जगाच्या कल्याणासाठीसुद्धा उपयोगात आणता येतो.

लुई पाश्चरसारखे, जगात कार्य आणि नाव ठेवून गेलेले महान लोक,'थोडा वेळ जरी चांगलं काम न करता गेला, तरी मी गुन्हा करतो आहे, असं मला वाटतं', असं का म्हणतात, ते कळेल! 'वाया जाऊ नेदी क्षण' असं म्हणणाऱ्या संतांनीही असंच अविश्रांत राबून, जगाचं कल्याण केलं !

'वेळ नाही' असं म्हणण्याचा आपल्याला अधिकार नाही, हे नक्की !

२६.'कर्तृत्व आणि सांभाळ'

आपण बुद्धिमान आहोत, शक्तिमान आहोत, स्वतंत्र आहोत आणि आपण खूप काही करू शकतो, असं अनेकांना वाटतं. हे सगळं तसं खरं आहे. पण माणसाला वाटतं, तेवढं सर्वस्वी खरं नाही, हे 'त्यापेक्षा खरं' आहे! आजारपणं, अनपेक्षित अपयशं, तुटणारी नाती, विलक्षण अपघात, आपल्याशी संबंधित घडणाऱ्या तांत्रिक चुका, आपल्याशी संबंधित नसलेले, पण आपल्याला तोट्यात टाकणारे बाजारातले चढउतार - अशा असंख्य गोष्टी, आपल्या कर्तृत्वावरच्या मर्यादा आपल्याला दाखवून देत असतात.

कामकाजातली यशं, नोकरीतली बढती, धंद्यातला अनपेक्षित नफा, ठरवल्यापेक्षाही उत्तम होणारं घर - अशाही अनेक गोष्टी आपण जरूर अनुभवल्या असतील.त्या आपल्यातल्या बुद्धीची, नियोजनाची, कष्टांची, कार्य करण्याच्या स्वतंत्र शक्तीची कल्पना जरूर आणून देतात. यात दुमत नाही.

पण केवळ त्यामुळं हुरळून जाऊन, आपलं कर्तृत्व जणू अमर्याद आहे, असल्या भ्रमात कुणी वावरलं, तर त्याला जमिनीवर आणणारे प्रसंग विजेसारखे चमकून जातात. त्यात आपण खचून जाण्यासारखं काही नसतं, तर आपल्या कर्तृत्वाच्या मर्यादा ओळखण्याचा समजूतदारपणा शिकवण्यासाठी, या विश्वाच्या शक्तीची ती व्यवस्था असते! समजुतीची कुवत कमी असली, की माणसाला कळतनकळत अहंकार होतो. त्यापासून त्याचं आणि जगाचं होणारं नुकसान वाचवण्यासाठी जगाचा सांभाळ करणाऱ्या शक्तीनं दिलेली ती चुणूक असते, जाणीव असते!

कुणी अकारण अहंभाव मिरवण्यासाठी अनेकांना बोलावलं, देखणा मंडप घातला, एखाद्याचं एकवेळचं पोट भागेल असल्या श्रीमंती पत्रिका काढल्या, तर ही विश्वशक्ती वारावादळानं त्या मंडपाची नामोनिशाणी उरू देत नाही, इतकंच नव्हे तर, तो मूळ मोठेपणा मिरवणारा कार्यक्रमसुद्धा, ती उधळून लावू शकते !

म्हणून समजून घ्यावं की, विश्वशक्तीला दगडापासून माणसापर्यंत सर्वांचाच उद्धार व्हावा, असं वाटतं. त्यासाठी तिनं प्रत्येकाला गरजेपुरती शक्ती दिलीही आहे. ती उपयोगात आणण्यानं उद्धार होतोच, पण खरा उद्धार हा, या शक्तींचा कुठला अहंकार होऊ न देता, उरलेलं सारं ज्या शक्तीच्या किंवा तिच्याशी एकरूप झालेल्या महापुरुषांच्या हाती ठेवलं आहे, त्यांना शरण जाण्यात, हा उद्धार पूर्ण होतो.

आपण कर्तृत्व करावं. दुबळेपणा-आळस हा ईश्वरालाही आवडत नाही. पण कर्तृत्व करताना या विश्वशक्तीला शरण जाऊन, आपला 'सांभाळ' करण्याची प्रार्थनाही करावी ! त्यामुळं आपला प्रवास पूर्णत्वाला जातो, आयुष्याचं सार्थकही होतं, त्यात समतोलही राहातो. आपलं कर्तृत्व आणि आपला केला जाणारा सांभाळ, या दोन रुळांवर आपल्या जीवनाची गाडी चालत असते, याचं सदैव स्मरण असावं!

एका सत्पुरुषांना एकानं विचारलं की,'ही आजूबाजूची माणसं विक्षिप्त, रागीट, वेळी व्यसनीही आहेत. त्यांना तुम्ही जवळ का ठेवून घेतलं आहे?'

ते म्हणाले,'ती भजनपूजन, सेवा करतात,जप करतात ना ? ती बाहेरच्या जगात असली असती तर, त्यांच्या दुर्गुणांमुळं जगाला एवढा

उपद्रव होईल, की त्यांचा सांभाळ इतर कोण करील?' हे लक्षात आणून देऊन ते पुढं म्हणाले,'एका बाजूनं ती थोडं कर्तव्य करताहेत ना, दुसऱ्या बाजूनं त्यांना चुकल्याची थोडी खंत वाटते आहे ना, अशांचा सांभाळ करणं ही आपली देवाची सेवाच नव्हे का ? ती वाईट आहेत, हे मला मान्य आहे. पण आपण सर्वस्वी चांगले आहोत, असं तुम्हाला तरी म्हणता येईल का? आपण जिथं कुठं कर्तृत्वात, गुणांत कमी आहोत, तिथंही आपण सांभाळले जातो, म्हणून इतपत चांगले आहोत, हे खरं आहे ना ?'

आपलं कर्तृत्व आणि आपला होणारा सांभाळ याची जाणीव ठेवली तर, आपल्या इतरांबद्दलच्या तक्रारी कमी होतील. त्यामुळं त्यांचे आपले संबंध अधिक चांगले राहतील. त्याचबरोबर आपलं जीवन समजूतदार, संतुलित आणि शांतीचं होईल, हे नक्कीच !

२७. 'सद्‌गुणांची वाटचाल'

आपलं आयुष्य सफल करतात आणि इतरांना आनंद देऊन जातात, ते सद्‌गुण ! लोभ, हेवा, मत्सर, राग, संचय, हिंसा, आळस, स्वार्थ - असे अनेक दुर्गुण, विकार हे इतके जन्मजात आणि सोपे ठेवले आहेत की, माणसाला तहान लागते, भूक लागते, त्यांचं शिक्षण त्याला द्यावं लागत नाही. तशी अवस्था दुर्गुणांची असते. दुर्गुणांनी आपलं आणि इतरांचंही नुकसान होतं आहे, याची जाणीव होणंही कठीण आहे. झालीच तर, ते स्वाभाविकच आहे, असं म्हणून त्यांचं समर्थन करायलाही मनुष्य मागंपुढं पाहात नाही. माणसाला दिलेल्या बुद्धिमत्तेची, विवेकाची परीक्षा घ्यायलाच, दुर्गुण इतके सहज, स्वाभाविक ठेवले आहेत की काय, असं वाटेल !

सद्‌गुणांची अवस्था मात्र वेगळी आहे. संयम, नम्रता, शांती, औदार्य, क्षमा, सहानुभूती, करुणा, सहनशीलता, शास्त्राभ्यास - अशा अनेक सद्‌गुणांचा आढळ माणसात इतक्या सहजपणे होत नाही. दुर्गुणांसारखी दुःख देणारी गोष्ट, इतकी सहज असावी आणि माणसाला स्वतःला, जगाला सुख देणारी सद्‌गुणांसारखी गोष्ट मात्र, अभ्यास, एकाग्रता, सातत्य - अशी कष्टसाध्य असावी, हीसुद्धा मनुष्याच्या विलक्षण जन्माची परीक्षाच आहे !

क्वचित काही लोकांच्या ठिकाणी, यांतल्या गुणांचा आढळ लवकर, सहजपणे होत असलेला दिसला तर, त्याला संस्कारांचा, पूर्वजन्मीचा अभ्यास कारणीभूत असतो, एवढंच! सद्‌गुणांची वाटचाल तितकीच कठीण असते.

या सद्‌गुणांच्या अभ्यासाच्या बाबतीत लौकिक मोठेपणाचा

कुठला संबंध नसतो. गणितशास्त्रासाठी आयुष्य वेचणारे यूक्लिड, आजही आपल्या अभ्यासानं महान आहेत. पूर्वीपासून राजे, मंत्री अशा अतिमहत्त्वाच्या व्यक्तींना जाण्यायेण्यासाठी राजमार्ग असतात. वेगळे रस्ते असतात. ते लौकिकदृष्ट्या गरजेचंही असतं.

टॉलेमी हे यूक्लिडच्या काळातले राजे होते. गणित शिकायची त्यांना मनस्वी ओढ लागली. यूक्लिडकडं येऊन त्यांनी अभ्यासाचे प्रयत्न केले. पण, हे सूक्ष्म शास्त्र त्यांना काही लवकर अवगत होईना.

म्हणून त्यांनी विचारलं,'गणित आत्मसात करायला काही सोपा, जवळचा मार्ग नाही का?'

यूक्लिड गांभीर्यानं पण स्पष्टपणानं म्हणाले,'लौकिकात राजांसाठी वेगळे, जवळचे राजमार्ग असतातही. पण सद्‌गुणांप्रमाणंच शास्त्राभ्यासासाठी एकाग्रता, अभ्यास आणि सबुरी यांच्याशिवाय दुसरा मार्ग राजांनाही नाही आणि इतरांनाही नाही!'

टॉलेमी समजूतदार होते. सद्‌गुणांच्या अभ्यासाचं मर्म लक्षात घेऊन, तितका काळ आणि कष्ट त्याला देऊन, त्यांनी गणित उत्तम रीतीनं आत्मसात केलं.

आज आपण अनेक घरांत पाहात असू की, मोठ्यांबद्दलचा आदर, विनय यांचा किती अभाव होत चालला आहे. माणसाकडून स्वार्थासाठी साहेबांना आदर मिळेल, पण जन्माचे उपकार असलेल्या वडीलधाऱ्यांची साधी विचारपूस होत नाही. कारण, खऱ्या आदराच्या सद्‌गुणांचा अभ्यास घडलेला नसतो.

फ्रान्सचे राजे चौथे हेनरी, अधिकाऱ्यांबरोबर रस्त्यानं जात असताना, एका गरीब माणसानं डोक्यावरची टोपी काढून,त्यांना आदरानं अभिवादन केलं. त्याच तत्परतेनं, हेनरींनी लगेच आपल्या

डोक्यावरची शाही टोपी काढून, आदरानं मस्तक झुकवलं. अधिकाऱ्यांना आश्चर्य वाटलं.त्या अधिकाऱ्यांनी त्याबद्दल राजेसाहेबांना विचारणा केली. राजे म्हणाले,'माझ्या राज्यातल्या गरीबाकडंही आदराचा एवढा सद्‌गुण वसत असेल आणि तो माझ्या ठिकाणी नसेल तर, मी राजा व्हायला लायक नाही !'

दुर्गुण मातीमोलानं सहज आणि हवेतेवढे मिळत असतील, पण ते दुःखही देतात आणि माणसाचं आयुष्यही वाया घालवतात ! सद्‌गुण दुर्मिळ असतील, त्यांची वाटचाल कठीण असेल, वेळ घेणारी असेल, पण ती आपल्याला आणि आपल्या बांधवांना आनंदाच्या गावी घेऊन जाते !

आपला जन्म या वाटचालीसाठीच आहे !

२८.'अलौकिक देणगी – जीभ'

माणसाला मिळालेल्या देणग्यांत जिभेसारखी विलक्षण वस्तू नाही ! तिची रचना आणि क्षमता यांच्यावर माणसानं विचार केला तरी, तो त्याच्या आयुष्याचं नक्की चीज करू शकेल. जीभ माणसांना जोडूही शकते, तोडूही शकते. तिला कुठलीही धार नसताना, ती तलवारीपेक्षाही मोठं काम करू शकते. झाडापासूनचा डिंक, शिजवलेली खळ, सामर्थ्यशाली केमिकल - यातलं काहीही नसलेली पण, त्यांच्यापेक्षा पुढं जाऊन, माणूसच नव्हे तर अंतरंग जोडणारी जीभच !

ओळखपाळख नसताना, प्रसंगाला कुणाचीही, कशाचीही मदत मिळवू शकणारी ही जीभच! मनातल्या सत्याचं, बाहेर असत्य किंवा असत्याचं सत्य उच्चारण करू शकणारी जीभच! हेरगिरीची पाताळयंत्रणा हाताळू शकणारी आणि विजयाचं पराजयात रूपांतर करणारी जीभच !

प्रसंगी जिवाच्या भीतीनं पळणाऱ्या सैन्याला, 'मागचे दोर कापले आहेत, आता जिंकू किंवा मरू' असं म्हणून, त्याच सैनिकांत, वीरश्रीचा संचार करून, समोर दिसणाऱ्या पराजयाचं, जयात रूपांतर करणारीसुद्धा हीच जीभ! टाकून बोलणारी,उपहास करणारी,मत्सराचे फुत्कार टाकणारी, हृदयाला दुःखाच्या डागण्या देऊ शकणारी - ही जीभच! त्याचबरोबर, वेळी जिव्हाळ्याच्या शब्दांनी दुःखावर फुंकर घालणारी, मरगळलेल्याला चैतन्य देणारीसुद्धा जीभच! जगाला प्रेरणा, शरणागताला आशीर्वाद आणि जगाचं कल्याण करणारे मंत्र उच्चारणारीसुद्धा - जीभच !

याच्यावर आपण एवढा विचार, माणूस म्हणून करण्याची गरज जरूर आहे. कारण त्यामुळं, तिच्या विधायक, विघातक सामर्थ्याची जाणीव माणसाला वेळीच होईल. ती जाणीव झाली आणि हीच जीभ समजून वापरली, तर जीवनाचं सार्थक करून घ्यायला, हीच जीभ खूप उपयोगी पडू शकेल ! ज्यांनी हे समजून ती वापरली, त्यांनी त्यांचं जीवन तर सार्थकी लावलंच आहे, पण इतरांनाही ते सार्थकाचं करायला मदत केली आहे!

प्रभाशंकर पट्टणी हे स्वातंत्र्यपूर्व काळातले एक अत्यंत विद्वान भारतीय होते. त्या काळच्या रिवाजाप्रमाणं, त्यांची योग्यता ओळखून, तत्कालीन इंग्रजी सरकारनं त्यांना 'सर' ही पदवी दिली होती. ते त्या काळी लंडनला होते.

एकदा सकाळी शुद्ध भारतीय वेशात, मोठी दाढी आणि हातांत एक मोठी लाठी घेऊन, ते लंडनच्या रस्त्यावरून, पायी फिरायला निघाले होते. त्यांना पाहून, रस्त्यावरच्या इंग्रज मुलांनी त्यांच्या चेष्टामस्करीला सुरुवात केली. काहींनी तर, लांबून खडेही मारले. एरवीच्या माणसाच्या रागाचा पारा चढला असता. मुलांची जीभ, ज्या भाषेत थट्टा करीत होती, तीच थट्टा त्याहीपेक्षा तिखट शब्दांत तेही करू शकले असते. पण, जिभेचा विधायक, उत्तम उपयोग जाणणारे, सर प्रभाशंकर मुलांकडं बघून म्हणाले,'वा, मुलांनो, तुमच्या ठिकाणी एकत्र येऊन, स्फूर्तीनं काम करण्याचा इतका उत्साह पाहून मी थक्क झालो. याच उत्साहानं, तुम्ही आयुष्यात कितीतरी चांगलं बोलू शकाल, काम करू शकाल!'

सर प्रभाशंकरांची ओळख नसलेल्या, त्या इंग्रज मुलांनी, जेव्हा त्यांच्या जिभेवरून अस्खलित इंग्रजीत बाहेर पडलेले हे शब्द

ऐकले, त्याक्षणी तो सगळा घोळका स्तब्ध झाला.

त्यांना आणखी उत्साहित करीत प्रभाशंकर म्हणाले,'आपल्या भेटीबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी, आपण एकत्र चहा घ्यायचा का?' या प्रसंगाची गाडी राग, तक्रार, शिक्षा - अशा कुठल्याही दिशेनं जाऊ शकली असती. त्यातून कितीही नुकसान उद्भवू शकलं असतं. पण जिभेचा विधायक आणि उत्तम उपयोग जाणणारे प्रभाशंकर, याच जिभेनं जे बोलू शकले, त्यामुळं विघातक बाजूला जाऊ शकणारी ही गाडी, तिथंच थांबली. आता या जिभेनं मुलांच्या ठिकाणी प्रथम स्तब्धता आणली. नंतर आश्चर्य. पुढं सर प्रभाशंकरांना अभिवादन, त्यांच्या जीवनाविषयी उत्सुकता, सद्भावना - निर्माण केली.

इतर इतक्या देणग्या उघड देणाऱ्या निसर्गानं, विस्मयजनक कामं करू शकणारी, ही विलक्षण जीभ मात्र, चेहऱ्यावर असूनसुद्धा, लपवून ठेवली आहे ! ती आपल्याला सावधानता आणि तिचा विधायक उपयोग शिकवण्यासाठीच !

२९.'खऱ्या सुखाची गुरुकिल्ली'

महत्त्वाच्या कामाची आठवण ठेवावी लागते. घड्याळ काही कोणासाठी थांबत नाही. परीक्षेला उशीरा पोचणं काय, गाडी सुटल्यावर स्टेशनवर पोचणं काय, मुलाखतीची वेळ संपल्यावर पोचणं काय - अनेक गोष्टींत आपल्याला लागते, ती सावधानता !

त्यात्या ठिकाणचं यश किंवा तीती कामं होणं हे पुष्कळदा अशा वेळेत सावध होण्यावर अवलंबून असतं. आधी भरपूर अभ्यास केला काय किंवा दोन महिने आधी गाडीचं आरक्षण केलं काय, या सावधानतेला पर्याय नसतोच. भरपूर अभ्यास केलेला आहे म्हणून किंवा दोन महिने आधीपासून पैसे भरले आहेत म्हणून, आपल्यासाठी सर्वांची परीक्षा थांबवली जात नाही की आपल्यासाठी गाडी उशीरा सोडली जात नाही ! म्हणून, 'सावध तो सुखी' हे लक्षात ठेवणं गरजेचं आहे !

सावधानता जीवन जगायला, यशस्वी व्हायला सारखी उपयोगी पडत असते. बेसावधतेनं होणारी नुकसानं अक्षरशः ठेच लागण्यापासून, जीव गमवावा लागण्यापर्यंत सर्वत्र पसरलेली आहेत. धोक्याच्या ठिकाणी सेल्फी काढताना, बेसावधतेनं प्राण गमावणाऱ्यांची संख्या कमी नाही. बेसावधपणे दाबलेली एखादी 'की' माणसाची तासन्‌तासाची मेहनत, क्षणार्धात समोरची फाईल नाहीशी करून टाकते. बेसावधपणे सोशल मीडियामध्ये टाकलेली प्रतिक्रिया, गोंधळच काय, सामाजिक प्रश्नही निर्माण करू शकते. बेसावधपणानं होणाऱ्या नुकसानींची व्याप्ती पाहिली की, सावधानतेचं माणसाच्या आयुष्यात किती मोलाचं स्थान आहे, याची गंभीर जाणीव होईल

आणि ती जागीही ठेवता येईल. सावधानता शिकायला खरंतर, कुठं जाण्याची गरजच नाही !

आपल्यात निसर्गानं सावध राहाण्याच्या इतक्या बिनचूक यंत्रणा ठेवल्या आहेत, त्यांचं नुसतं चिंतन जरी रोज पाच मिनिटं शांत बसून केलं तरी, दिवसभर ही सावधानता बाळगणं, आपलं नुकसान टाळणं, त्या सावधानतेमुळं होणारे लाभ मिळवणं जरूर शक्य होईल.

आपल्या लक्षात येण्याच्याही आत, वाऱ्यानं उडालेला धुळीचा कण, डोळ्यांत प्रवेश करण्यापूर्वी, क्षणार्धात, ज्या सावधानतेनं आपल्या डोळ्यांच्या पापण्या मिटल्या जातात, तेवढं जरी लक्षात आलं तरी, निसर्ग किती सावधानतेनं नुकसान टाळतो, त्याची जाणीव होऊ शकेल. असं अनेक बाबतीत अखंड सुरू असतं. दुसऱ्या बाजूला, घरी परतायला रात्र झाली तर, पडणाऱ्या अंधारात आपल्यालासुद्धा कळत नसताना, मोठ्या होणाऱ्या डोळ्यांच्या यंत्रणा आपल्याला सुखरूप घरी आणताआणता, रात्र झाल्यावर फुलणाऱ्या निशिगंधाच्या, वाटेतल्या कुठल्यातरी फुलांचा सुगंध, तितक्याच सावधानतेनं आपल्यापर्यंत पोचवून आनंद देतात.

आपल्या हातांच्या नकळत, चुकून तोंडी गेलेल्या घासातलं तिखट हानिकारक असलं तर, त्याची सूचना तितक्याच सावधानतेनं जीभ देते. इतकंच काय, जीभही ओलांडून पोटात प्रवेश करणारा पदार्थ विषारी असला तर, तो तितक्याच तत्परतेनं बाहेर फेकण्याची निसर्गाची यंत्रणा, किती सावधानतेनं काम करीत असते ते पाहावं !

निसर्गाच्या क्रमानं चालणाऱ्या या यंत्रणा,एवढ्या सावध राहून आपला सांभाळ करतात, आपलं नुकसान टाळतात! तरीही आपलं नुकसान झालेलं आपण पाहातो! तेव्हा लक्षात येतं की,काहीवेळा

आपणच या सावधानता देणाऱ्या निसर्गाच्या यंत्रणांना, सहकार्य केलेलं नसतं. प्रमाणापेक्षा जास्त असल्यामुळं त्रास देणारं तिखट अन्नात आहे, याबद्दल जिभेनं सावध करूनही, ते खाल्ल्यावर शरीरात होणारी जळजळ, पित्त यांचा त्रास निसर्गानं होत नाही तर, आपण न केलेल्या सहकार्यानं होतो! हे अर्थातच, एखाददुसऱ्या बाबतीत नसतं!

त्या बाबतीत आपल्या लक्षात येईल की, एरवी आपल्याला बेसावध करून नुकसान घडवतं, ते आपलं मन ! गजर बंद करणारं, बोलण्यापूर्वी विचार न करणारं, बिनगरजेच्या ठिकाणी पैसा - वेळ खर्च करणारं, प्रतिबंध शक्य असतानाही ते उपाय न करता, आजार ओढवून घेणारं - अशी असंख्य नुकसानं करणारं हे मन आपण ओळखू शकू !

निसर्ग सावध राहायला मदत करतो आहेच, पण 'खऱ्या सुखाची गुरुकिल्ली' मनाच्या सावधानतेकडं आहे, हे ओळखणारा, कायम सुखी राहील !

३०.'निःशब्द मदतनीस !'

आपण घरात असो किंवा बाहेरच्या जगात, झोपेची वेळ वगळता, एरवी काही ना काही कामातच असतो. बाहेर गेलो तर नक्कीच काही कामासाठीच गेलेले असतो. एकदा बाहेर गेल्यावर कामाचं स्वरूप, हे अगदी नुसतं व्यायामासाठी फिरण्यापासून ते नोकरी, व्यवसाय अशा कुठल्याही स्वरूपाचं असू शकतं. घरात काय, बाहेर काय, काम करताना इतर माणसांशी संबंध येतो. काम कुठलंही असलं तरी, त्यात बोलण्याचा संबंध येतो, शब्दांचा संबंध येतो. गप्प राहून घरी किंवा बाहेर काम करणं हे जमण्यासारखं असलं, तरी ते प्रमाण फार कमी असतं. त्यामुळं शब्दांचं आणि बोलण्याचं स्थान माणसाच्या जीवनात खूप मोठं आहे. तीच गोष्ट लिखित शब्दांची आहे.

पण आपल्याला अनुभव येईल, की बोलताना असो किंवा लिहिताना असो, शब्द नसलेल्या, म्हणजे त्या अर्थानं,निःशब्द असलेल्या एका गोष्टीची आपण नकळत मदत घेत असतो. काही वेळा शब्दानं जे काम साधणार नाही, ते या गोष्टीनं साधतं, ती गोष्ट म्हणजे आपल्या शब्दसंग्रहातली 'चिन्हं' ! शब्द एकापुढे एक ठेवलेले असले, ते तेच असले, तरी या चिन्हांशिवाय जो परिणाम आपल्याला साधायचा, त्याला हे आपले मूक साथीदार मोठी मदत करीत असतात. त्याचबरोबर त्यांची जाणीव नसली, तर अनेकदा आपल्याला अपेक्षित परिणाम साधता येत नाही, उलट त्याच शब्दांचा विपर्यस्त परिणाम होऊ शकतो. म्हणून भाषा किंवा बोली लिहिण्यावाचण्याबरोबरच याचा अभ्यासही आपल्याला अनेकदा खूप

मोलाचाठरतो.

'हे काम तू कर, ते काम तू कर' हेच बोलताना शेवटी एक पूर्णविराम असेल, तर येणारा प्रतिसाद वेगळा असतो, तर 'हे काम तू कर, ते काम तू कर....' अशी पूर्णविरामासारखी चारपाच टिंबं असतील, तर उरलेली कामं दुसरं कुणीतरी करणार आहे, हे लक्षात येऊन येणारा प्रतिसाद बदलतो. 'मधू' म्हणून मारलेल्या हाकेनं येणारी प्रतिक्रिया आणि प्रत्यक्ष येणं सावकाश घडतं, तर त्याच मधूसमोर 'मधूऽऽऽ!' असे नुसते तीन अवग्रह आणि एखादं हळुवार उद्‌गारचिन्ह असेल, तर पाच मिनिटांनी येणारा मधू एका मिनिटात आणि उत्साहानं येतो.

शब्दाखाली दिलेली अधोरेखासुद्धा वरच्या वाक्यांचा भाव बदलते. 'सर्वांनी हजर राहावे' याच ठिकाणी हजर राहावे ऐवजी 'सर्वांनी हजर राहावे' असं अधोरेखित केलं की, आधीच्या वाक्यात हजर राहाण्याची वाटलेली ताकीद न वाटता, हे आपल्याबरोबरच सर्वांसाठी आहे, अशी भावना होऊन त्यातल्या ताकिदीचा त्रास कमी होऊन, ते सहज वाटून - हजर राहाण्याकडं कल होतो.

नुसता 'वा' असा शब्द लिहिला किंवा उच्चारला, तर तो ज्या कामाबद्दल त्या व्यक्तीला उच्चारला, त्या व्यक्तीला फारसा उत्साहजनक वाटत नाही. पण त्याचबरोबर 'वाऽऽऽ!' एवढी थोडीशी निःशब्द चिन्हं आली की, ऐकणारा उत्साहित होतो. जे काम तो शब्द करू शकत नाही, ते ती निःशब्द चिन्हं करतात. अशा असंख्य उद्‌गारांमध्ये ही चिन्हं मोलाचं काम करीत असतात, असं आपल्याला आढळून येईल.

'हे तू बोललास' या एकाच वाक्यात स्वल्पविराम, अवतरणचिन्ह, प्रश्नचिन्ह आणि उद्‌गारचिन्ह कुठं आहेत, याच्यावर

त्यांतून त्याच वाक्याचे अर्थ किती बदलत जातात !

'हे 'तू' बोललास?'

'हे तू 'बोललास'?'

''हे' तू बोललास!'

'हे तूऽऽ बोललास?'

एवढं एखादं उदाहरणसुद्धा आपल्याला या शब्दांच्या निःशब्द साथीदारांच्या कामाची कल्पना आणून देऊ शकतं! ती वापरताना राहिली, चुकली तर त्याचा परिणाम आपल्या संवादावर आणि कामावर स्वाभाविकपणे चांगला किंवा वाईट होऊ शकतो.

माणसांच्या शब्दमय जगात, असंख्य वेळा स्थान असणाऱ्या या 'निःशब्द मदतनीसां'चं स्थान आणि महत्त्व ओळखणं, आपल्याच संवादाला नेटकं आणि उपयुक्त बनवतं. हे महत्त्व जाणवून द्यायलासुद्धा लागतं ते हे एक 'उद्‌गारचिन्ह'च '!'

३१.'क्षणभर–मणभर'

घरातलं कुणीतरी आधी जेवायला बसतं. बाकीची तिघंचौघं इकडंतिकडं काही कामात असतात. जेवणारा जेवायला सुरुवात करतो. दोनतीन घासांतच तो 'अरेरे' असं हळू आवाजात पुटपुटतो. वाढणारी आई मागं वळते, ती पुढचं वाढायला म्हणून. पण तिला ते ऐकू जातं. मागं पाहिल्यावर जेवणाऱ्याचा चेहरा थोडा कसानुसा झाल्याचं लक्षात येतं. आई 'काय झालं, काय झालं' म्हणून मोठमोठ्यानं विचारायला लागते. तो हातानंच 'काही नाही'ची खूण करतो. ऑफिसला उशीर झालेला असतो. तो भरभर जेवायला लागतो. पण आईला राहावत नाही. ती अंदाजानं विचारते,'काही कमी जास्त झालं का ?' तो खुणेनंच मीठ कमी झाल्याचं सांगतो. कणभर मीठ भाजीवर वाढून प्रश्न मिटण्यासारखा असतो. पातेल्यात उरलेल्या साऱ्या भाजीत राहिलेलं मीठ बरोबर टाकून, तो प्रश्न पूर्णच मिटू शकतो. मिटवलाही जातो.

पण आईचं बोलणं सुरू होतं. 'भाजी करताना लक्ष नसलं म्हणजे असं होतं. आपण काय आता दुरुस्त करून घेऊ. पण त्याला अळणी खावं लागलं...!' इथून सुरू झालेली ती गाडी - असं पूर्वी कधी-केव्हा झालं, वारंवार कसं होतं आहे, आपलं कामात कसं लक्ष हवं - असं मणभर स्वगत, पण ऐकू जाईल एवढ्या आवाजात म्हणून, कधीतरी थांबते. कारण ती भाजी सुनेनं केलेली असते. अर्थातच त्याच्या प्रतिक्रिया तिच्याकडून उमटतात. 'एखाद्या वेळी असं होतं, एरवी नाही का सगळं बरोबर होत, इतरांचं नाही का कधी राहात...!' अशा तऱ्हेनं एखाद्या कणभर गोष्टीला अकारणच मणभर

चर्चेचं स्वरूप येतं. सहज सोडून देण्यासारख्या, कुणाची तक्रार नसलेल्या साध्याशा गोष्टी, मनं कलुषित करून टाकतात. कणभर असलेल्या त्रुटीला, मणभराचं स्वरूप देण्याचा, हा एक दुष्परिणाम असतो. तो लक्षात घेऊन टाळण्यासारखाही असतो.

असं इथंच नाही, अनेक बाबतीत, अनेक संबंधात, अनेक विषयांत घडत असतं. याकडं लक्ष गेलं, तर आपल्या रोजच्या आयुष्यातले कितीतरी त्रास टाळता येण्यासारखे आहेत. एखादी चूक, संघर्ष खरं तर कणभर असतो. पण चर्चा करीत सुटलं, उगाळीत राहिलं, तर मणभर होऊन स्वास्थ्य घालवतो. कणभर म्हणजे त्या अर्थानं, एखादा चुकीचा शब्द, छोटीशी वस्तू, छोटंसं विसरलेलं काम. अशा अनेक बाबतीत ते 'छोटंसं' आहे, 'कणभर' आहे, ते असलं तरी, तेवढंच महत्त्व देण्यासारखं आहे, याची जाणीव असली, भान असलं, तर ते तिथंच सोडून देता येतं. वेळी दुरुस्त करता येतं. तेते विषय तिथं संपूनही जातात. पण हे भान नसलं, हे माहीत नसलं, तर एक प्रकारचं अडाणीपण माणूस करून बसतो. मग त्या कणाला मणाचं महत्त्व येतं आणि विषय तिसरीकडंच जाऊन अकारणच अस्वास्थ्य, गैरसमज होतात, पसरतात.

तीच गोष्ट आजारपणं, अपयशं, वेगवेगळी दुःखं, अप्रिय घटना - या बाबतीतही असते. किरकोळ तापारलेल्याला साधी विश्रांती, लंघन, किरकोळ औषध एवढं पुरेसं असतं. एखाद्या दिवसात मनुष्य पुन्हा कामालाही लागतो. पण मनानं एकदा आता अंग गरम आहे, म्हणजे ताप, फ्ल्यू, इन्फेक्शन, मुदतीचा ताप असं हळूहळू त्याला मणभराचं महत्त्व दिलं गेलं, की ते अनेकदा तसंच स्वरूप धारण करतं. मग औषधं, इन्जेक्शनस्, बरं व्हायला विलंब,

रजा, खर्च - असा सारा त्रास होऊन बसतो. तीच गोष्ट अशा अपयशांची, अप्रिय घटनांची असते. तसं चुकीचं महत्त्व दिलं गेलं, तर मग त्यातून बाहेर पडणं अकारणच अवघड होऊन जातं !

खरं सांगायचं तर जर त्रास, उणिवा, त्रुटी, अपयशं मणभर असतील, तर त्यांना कणभराचं महत्त्व देऊन, उलट त्यांचा त्रास कमी करण्याचं सामर्थ्य माणसाच्या अंगी आहे ! मोठमोठे आजार, अपयशंही सहज पेलून, या विद्येनं स्वतःचा आणि इतरांचा त्रास कमी करू शकणारे भाग्यवान लोकही या जगात आहेत. ते स्वतःही त्यामुळं आनंदात राहातात आणि इतरांनाही स्वास्थ्यात ठेवतात !

दुःखाच्या कणाचा मण करून, स्वतःला आणि इतरांना त्रास निर्माण करणं किंवा दुःखाच्या मणालाही कणाचं महत्त्व देऊन, स्वतःला आणि इतरांना स्वास्थ्यात ठेवणं शक्य आहे. हे लक्षात आल्यावर आता निवड आपली आहे !

३२.'योग्यतेचे (!) भ्रम'

तशी प्रत्येक माणसाजवळ काही ना काही काम करण्याची योग्यता असते. त्याचा सारा व्यवहार, प्रपंच, कौटुंबिक कामं, नोकरी - अशा साऱ्या गोष्टी अंगी असलेल्या योग्यतेमुळंच माणूस करीत असतो. जन्मतः लाभलेलं शरीर, ही त्याला निसर्गानं दिलेली, कामकाजासाठी लागणारी पहिली योग्यता असते. नियमित आहारविहार, व्यायाम यानं त्याची शारीरिक क्षमता वाढून मूळच्या मिळालेल्या या योग्यतेत तो चांगली भर घालू शकतो. मात्र एवढ्या प्राथमिक योग्यतेवर आयुष्याचा व्यवहार चालत नाही. इतर अनेक प्रकारच्या योग्यता त्याला प्रयत्नपूर्वक मिळवाव्या लागतात. अशा योग्यता शिक्षण, तंत्रज्ञान, कला, संवादासारखी अनेक प्रकारची कौशल्यं - यांमुळं मिळतात, वाढत जातात. त्या योग्यतांच्या साहाय्यानं मनुष्य वेगवेगळ्या क्षेत्रांत कर्तृत्व करू शकतो. त्यामुळं त्याला अनुभव, पैसा, प्रतिष्ठा अशा अनेक गोष्टी मिळून तो यशस्वी होतो.

हे सगळं इतकं चांगलं असताना या 'योग्यता' माणसाला आनंदाऐवजी अनेकदा दुःखात टाकताना का दिसतात, हे वेळीच शोधलं तर खचितच उपयोगी पडेल ! अनेकदा घरात काय, ऑफिसमध्ये काय उघडपणे किंवा खासगीत 'आपल्या योग्यतेचं' आपल्याला मिळालेलं नाही, अशी खंत करताना अनेकजण दिसतील. काही बोलतात, काहींच्या मनात ती राहून जाते. आपल्याला दिलेलं काम सामान्य स्वरूपाचं आहे, आपण खरंतर अधिक जबाबदारीची कामं करू शकतो,असं अनेकांना वाटतं. कारण

त्यांच्या दृष्टीनं त्यांना दिलेली पोस्ट, त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी ही कमी योग्यतेची आहे, असं वाटतं. नोकरीत बढती मिळताना, वरच्या जागा मिळतानासुद्धा त्यांना अनेक अयोग्य, कमी पात्रतेची माणसं पुढं गेलेली आहेत, असं वाटतं. 'आपली योग्यता' त्यांच्यापेक्षा जास्त असूनसुद्धा आपण डावललो जात आहोत, आपल्याला खाली ठेवलं जात आहे, अशीही अनेकांची भावना अनेक वर्षं असते. व्यवस्थेमध्ये थोडा अन्याय होऊ शकतो. पण ही खंत निर्माण होण्याचं कारण, अनेकदा स्वतःच्या योग्यतेबद्दलच्या भ्रमातच असतं ! वास्तविक, प्रत्येकाची योग्यता त्याच्यापेक्षा जग अधिक चांगली जाणतं. आपण जिथं आत्ता आहोत, ती जागासुद्धा काही योग्यतेचीच असते. कमी योग्यतेची नसते. त्यासाठी लागणारी योग्यता आपल्याजवळ असते, म्हणूनच ती मिळालेली असते. वरच्या जागेसाठी लागणारे गुण कदाचित आपल्याजवळ असतील, पण तिथं न चालणारे काही अवगुणही आपल्यात असतात, त्याची जाणीव नसल्यामुळं हा 'योग्यतेचा भ्रम' निर्माण होतो. तो अकारणच आपल्याला त्रास देतो!

हा भ्रम तसा खूप व्यापक आहे आणि अनेकांना दुःख देणारा आहे, अस्वस्थ ठेवणारा आहे, अनेक संधीही घालवणारा आहे. चांगली नोकरीचाकरी असलेले अनेक वर 'आपल्या योग्यतेचे' नाहीत,अशा भ्रमात अनेक वधू, वधूच राहतात. वर कधीच विवाहित होऊन जातात.नोकरी माझ्या योग्यतेची नाही, म्हणून अनेक तरुण 'नोकरी डॉटकॉम' सारख्या रेल्वेच्या फलाटावर, वय उलटून जाईपर्यंत ताटकळत राहतात.निराश होतात. येईल ती गाडी पकडून जाणारे तोवर अनेक स्टेशनं ओलांडून पुढच्या गावी पोचलेलेअसतात.

पगाराचं मिळालेलं पॅकेज तसं पुरेसं असतानाही, ते माझ्या योग्यतेचं नाही, असं वाटून समोरच्या कामांत लक्ष न लागणारे आणि रोज उठून मोठ्या पॅकेजच्या शोधात, मोलाचा वेळ घालवणारे आपल्याला भेटतील. आपलं राहतं घर, आपल्या गाड्या, आपले शेजारीपाजारी - अशा अनेक गोष्टी आपल्या योग्यतेशी जुळणाऱ्या नाहीत, असे विचार सारखे मनात येऊन त्यातलं कायकाय, कसंकसं बदलता येईल, यावर अनेकांचा वेळ जात असतो. असे त्रास योग्यतेच्या भ्रमातून निर्माण झालेले असतात. त्यासाठी आपली बुद्धिमत्ता, कर्तृत्व, गुण, अवगुण थोडे तटस्थतेनं पाहिले, तर आपली परिस्थिती, भले समाज देवो, निसर्ग देवो, ईश्वर देवो, ती योग्य आहे, हे लक्षात येऊन चित्त बरंचसं शांत होईल ! अजून जी जी कुवत असेल ती वाढवली तर, योग्यता आपोआपच वाढते आणि तिला न्यायही मिळतो !

हा आपल्याकडूनच निर्माण झालेला त्रास आहे. तो दूर करणंही अशा आकलनामुळं आपल्याला शक्य आहे. काहीही असलं तरी, आपल्या योग्यतेचीच टोपी परिस्थिती आपल्याला घालीत असते आणि आनंदाची गोष्ट ही की, आपली योग्यता वाढवली तर, परिस्थितीही त्या प्रमाणात मोठी टोपी आपल्याला जरूर देत असते! त्यासाठी योग्यतेच्या भ्रमातून मोकळं होऊन, खरी योग्यता वाढवणं अखेर आपल्याच हातात आहे !

३३.'हौसेला मोल आहे !'

हौसेला मोल आहे, असं म्हटलं तर ऐकताना काहीतरी चुकल्यासारखं वाटतं ! शेकडो वर्षं, पिढ्यान्‌पिढ्या आपण ऐकत आलो आहोत ते, 'हौसेला मोल नाही' असंच. तो वाक्‌प्रचार म्हणून रूढ होण्याइतपत परिस्थितीही त्यावेळेला होती. पण त्यावर आता विचार, कृती करण्याचीही वेळ आली आहे !

त्यावेळच्या परिस्थितीचा आपण विचार करू. तसा हौसेला विषय नसल्यामुळं, विचार करू त्यात्या विषयांत आपल्याला याचा खरेपणा पटत जाईल. वर्षभराचे दिवस रोज आमटी-भात-भाकरी-चटणी खाण्यात जात होते. वर्षातून कधीतरी गौरीगणपती, दसरा-दिवाळी असे उरलेले सहासहा महिने वाट बघायला लावणारे सण येत होते. मग त्यावेळी होणारे नाना पदार्थ, हा हौसेनं करण्याचा विषय होता. वर्षातून एखाद्या वेळेला मिळणारा पोशाख - साडी - ड्रेस सारंच वाट पाहायला लावणारं आणि त्याचं कौतुक पुढं वर्षभर राहणारं होतं. हौसेच्या पुढं, त्याला लागणाऱ्या मोलाकडं अर्थात पैशाकडं 'हौसेला मोल नाही' म्हणून कधी मागंपुढं पाहिलं जात नव्हतं. खर्चाचा ताण येत असला तरी, आधी किंवा नंतर तो सोसण्यातही आनंद होता. वर्षातून एखाददुसरा सण करणं, हौसेचं मोल मोजणं शक्य होतं !

आता सणवार एवढे मोजके नाहीत. आपले तर वाढलेच, पण आता संस्कृतीच्या आदानप्रदानामुळं म्हणा किंवा आपल्याला हौसेची सवय वाढत गेली म्हणून म्हणा, नुसत्या सणावारांनीच वर्ष भरून गेलं आहे असं नाही, तर अनेक व्यक्तिगत आणि सामाजिक

कामांचे दिवस वर्षातून एकदा येऊनसुद्धा, सणावारांइतके मोलाचे झाले आहेत. त्यात पुन्हा माणसाच्या जन्मदिवसाचं, कर्तृत्वाशी फारसं नातं न उरल्यामुळं, कुणाचाही वाढदिवस आता तारखेनंही होतो, तिथीनंही होतो. नोकरीत लागल्याचा होतो, बढती मिळाल्याचा होतो, नोकरी बदलल्याचा होतो, नोकरी सोडल्याचा होतो. या साऱ्या तारखा लक्षात ठेवण्यासारख्या असल्या तरी, त्याला सणासुदीचं महत्त्व द्यायचं ठरवलं तर, त्याचं मोल मोजताना काहींची उधळपट्टी होईल, काहींना नाकी नऊ येतील तर, परिस्थिती नसल्यामुळं काही त्यापासून पूर्ण वंचितही राहतील.

तीच गोष्ट वर्षातून एखाद्या वेळेस आणि त्यातही फक्त मोजके पदार्थ बघायला मिळणाऱ्या दिवाळीची आहे. हौस वाढली असो, सुबत्ता वाढली असो, उपलब्धता वाढली असो - वर्षभर कधीही आणि कुठलेही हौसेचे पदार्थ मिळणं आणि खाणं आता सोयीचं, सवयीचं झालं आहे. ते इतकं की, आता दिवाळीत वरणभात नाहीतर पिठलंभाकरी करा, म्हणण्याइतपत वेळ या हौसेनं आणली आहे. तीच गत नव्या वर्षाची आहे. खरंतर, नवं वर्ष हे वर्षातून 'एकदाच' येऊ शकतं. पण आता एक जानेवारी, एक एप्रिल, दिवाळी, गुढीपाडवा - असं करीतकरीत वेगवेगळ्या कारणांसाठी नववर्ष एकाच वर्षात 'अनेकदा' येतं ! त्याशिवाय राष्ट्रीय सण, असंख्य संस्थांचे महत्त्वाचे दिवस, धर्माधर्मांप्रमाणं सणउत्सव - अशा असंख्य गोष्टींनी वर्षच काय, दर आठवडा व्यापलेला असतो.

संपर्कमाध्यमांच्या अकल्पित आणि बेसावध वाढीमुळं वाढदिवसाला शुभेच्छा देणारा एखादा माणूस, एखादी राखी, एखादी ओवाळणी, कारणपरत्वे एखादा शुभसंदेश - इतकं ते आता साधं

राहिलेलं नाही. यांतल्या एखाद्या निमित्तानं शेकडो - हजारो शुभेच्छा, चित्रं, फोटो जगभर फिरत असतात. हौस एखादी होती, तेव्हा तिला मोलंही होतं, तिचं महत्त्वही होतं ! नकळत वाढलेल्या या हौसेनं, तिच्यातलं कौतुक आणि आनंद कमी होत आहेत. एवढंच नव्हे, त्यावरचा खर्चही कुठल्याकुठं गेला आहे, हे एखाद्या वर्षाचा आढावा घेतला तर, नक्की लक्षात येईल.

त्यात दुसऱ्या बाजूला गरिबांना, वंचितांना वर्षातली एक दिवाळीसुद्धा, आपणच दुर्लभ करून ठेवली आहे. माझ्या एका दिवाळीच्या खर्चात, चार घरची दिवाळी होऊ शकते. एका विवाहाच्या खर्चात, इतर दोघांचे विवाह पार पडू शकतात. उंची वस्त्रांत अजून चार व्यक्तींची वर्षाची सोय होऊ शकते. हे आपण वेळीच ओळखू शकलो, तर असल्या गोष्टी कायद्यानं कमी करण्याची वेळ येणार नाही. त्यात मौज आणि सामाजिक भानही राहील. आपल्या घरात शंभर पणत्या लावून होणाऱ्या आनंदापेक्षा, इतर अजून शंभर घरांत एकेक पणती लागल्यानं होणारा आनंद किती मोठा असतो, याची कल्पना येईल !

मात्र त्यासाठी 'हौसेला मोल नाही' या वाक्प्रचारानं रूढ झालेला, बेसावध संस्कार विचारपूर्वक सोडला तर, 'हौसेला 'मोल' आहे', इतकंच नव्हे तर, ते अवाढव्य आणि अकारण आहे, याचं भान येईल. ते काळानुरूप आपल्या हिताचं आहे आणि समाजाच्याही!

३४.'जीवनचिंतनाची गरज !'

या पुस्तकाच्या निमित्तानं आपण 'जीवनाचं चिंतन' करीत आहोत. त्याबद्दल उत्सुकता, जिव्हाळा आणि प्रेम बाळगणाऱ्या, आपल्यासारख्या असंख्य वाचकांमुळं आणि अनाम ईश्वरी शक्तीमुळं हे शक्य झालं. त्याचा समारोप करताना आपण पाहू की, हे 'जीवनाचं' चिंतन आपण का केलं,पुढंही आपापल्यापरीनं का करावं?

कारण कुणी त्याला कसलंही नाव देवो, माणसाला खरी हवी असते ती शांती, समाधान, आनंद ! तेही सारं नित्य टिकणारं! त्याला जशी नावं वेगवेगळी असू शकतात, तशा, त्यासाठी चालणाऱ्या धडपडीसुद्धा वेगवेगळ्या असू शकतात. आश्चर्य वाटेल की, असंख्य संघर्ष, चळवळी, इतकंच काय, युद्धंसुद्धा या 'शांती'साठी चालल्याचं दिसेल ! म्हणून, जीवनाच्या चिंतनाची प्रकर्षानं गरज आहे !

किती चाललो, वाटेत किती हाल झाले - हे सगळं महत्त्वाचंच असतं, पण एक लक्षात घ्यावं की, हे सगळं आदर्श असलं तरी, मुळात,'चाललेला रस्ता बरोबर होता की नाही', हे सर्वांत जास्त महत्त्वाचं असतं ना ! तो बरोबर असला तर, या साऱ्या धडपडीला अर्थ असतो !

महापुरुषांनी हे ओळखून, माणसाला सावध करण्याचे आणि प्रवासच, पण तो 'बरोबर दिशेनं' होण्यासाठी तळमळीचे प्रयत्न केले आहेत. सुखाच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या वाटा, जीवनाच्या अंतिम टप्प्यावर काय देतात, ते पाहायला सांगितलं आहे.

लौकिकातलं सगळं मिळवलं तरी, 'ततः किम्','ततः किम्',

-अर्थात जगातलं, लौकिकातलं सगळं मिळवलं 'म्हणून काय झालं', असं म्हणणाऱ्या, आद्य शंकराचार्यांपासून ते भगवान बुद्धांपर्यंत, सर्वांनी जीवनाविषयी हीच सावधानता दिली आहे. योग्य मार्गानं जायला सुचवलं आहे.

बुद्ध तर, उपदेश घ्यायला येणाऱ्या नव्या शिष्याला, पहिल्यांदा अनेकांचे अंतकाळ पाहून यायला सांगत. लौकिक मोठेपणाच्या फोल अंतकाळाचं, जागृत करणारं भस्म धारण केल्याशिवाय, शाश्वत, अलौकिक कल्पनांचं आणि त्यानुसार जगण्याचं मोल कळत नाही !

आपल्याला याची कल्पना आहे की, आपल्या आधी जग होतं, आज आहे, पुढं राहणार. जगावरून भल्याबुऱ्या मार्गांची कल्पना येईल, आणि ते बदलून सुखी होण्याच्या कल्पनांचा निरास होईल! पण खरा उपयोग होईल, तो आपल्याला निसर्गानं, कृपाळूपणे दिलेल्या 'मनुष्यजीवनाच्या' चिंतनानंच!

जगावर आपल्या कल्पना लादणारे आणि आपल्या मार्गानं जगाची फरपट करणारे हुकूमशहा येऊन गेले. परोपकारी राजे येऊन गेले. जगाची वाटचाल थांबली नाही आणि दिशाही फारशी बदलली नाही. त्यामुळं, जगावर चिंतन करून जग तर बदलणार नाही, तशी गरज असली तरी, ते शक्यही नाही! गरज आहे ती, स्वतःवर आणि स्वतःच्या संबंधांतल्या व्यवहारांवर, त्याला दिशा देणाऱ्या मन आणि मेंदूवर, चिंतन करण्याची !

त्याच विचारावर वारंवार चिंतन केल्यानं, चित्तावर खोल संस्कार घडतात. ते आपल्या आजच्या चुकीच्या-बरोबर कृतींना नकळत प्रेरणा देतात.त्यामुळं, सुख-दुःखाचे हेलकावे बसतात,अशांती

येते! शांती यायची तर, विधायक चिंतनानं चित्तापर्यंत पोचलो, तर चित्ताचा पालट होऊन ती येईल. ते चित्त आता कृतींना संतुलित प्रेरणा देईल. सुख-दुःखाचे हेलकावे उरणार नाहीत.

आपण आपल्याच चित्तातला बदल घडवीत असल्यामुळं, त्यानं आपल्या जीवनात, समाधानाचा प्रकाश तर पसरेलच, पण आपल्या संबंधांवरही तोच समाधानाचा प्रकाश पडेल ! तसं, हे कार्य जितक्या व्यक्ती करतील, तितका त्यांच्यातला-जगातला क्षोभ, अस्वास्थ्य यांचा अंधार नक्की मागं हटेल !

चिंतनाच्या उजळणीनं चित्त बनतं ! त्यानंच असा चित्ताचा पालट घडतो ! ते मनःपूर्वक केलं तर, शांतीला वेगळं आमंत्रण द्यायला नको ! तसं विधायक चिंतन आपणा सर्वांकडून घडो, अशी कळकळीची प्रार्थना करून, आपण या 'जीवनचिंतना'चा इथं समारोप करूया. पण हे लक्षात ठेवूया की, जीवनाला समारोप नाही, तसाच चिंतनालाही !

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची
(आता डिजिटल स्वरूपात)

१. **ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :** श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)** : चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. **साधनप्रेरणा :** नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. **मेरी यात्रा (हिंदी) :** हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) : डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. पावनपथ : श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. अनुभवपुष्पे - भाग १ : चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. कृतज्ञतामार्ग : कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)**
श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

***

अनुभव छोटे, महत्त्व मोठे !



सामान्य माणसाला सुखी होण्यासाठी त्याच्यापुरता हाती असलेला उपाय म्हणजे, त्याला येणाऱ्या छोट्याछोट्या अनुभवांतून शिकण्याचा मार्ग ! तसं शिकणं अनेकदा परिचित नसतं, असलं तरी बेसावधतेनं असे अनुभव हातून निसटून जातात. ते छोटे असले तरी, ते आपल्याला सुखी होण्यासाठी मोठा आशय देऊन जात असतात. त्यांतलंच उपयोगी असं थोडं काही, या 'जीवनचिंतना'च्या निमित्तानं जिज्ञासूंच्या हाती ठेवण्याचा हा नम्र प्रयास !